पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १६१ ■ गुरूवार, दि. १८ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS
पाहण्यासाठी
QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




# जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बस्फोटाची धमकी....!

## प्रशासन, पोलीस यंत्रणा सतर्क - शहरात प्रचंड खळबळ





प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला:** अकोला जिल्हाधिकारी कार्यालय बॉम्बने उडवून देण्याची थरारक धमकी मिळाल्याने गुरुवारी सकाळी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा हादरून गेली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत ई-मेलवर आलेल्या निनावी धमकीमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले असून, प्रशासन आणि पोलीस दलाने युद्धपातळीवर हालचाली सुरू केल्या आहेत.

आज गुरुवार, १८ डिसेंबर, सकाळी ११ वाजताच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शासकीय ई-मेल आयडीवर एक अत्यंत गंभीर आणि धक्कादायक ई-मेल प्राप्त झाला. 'दुपारी २ वाजेपर्यंत कार्यालय रिकामे करा, अन्यथा बॉम्बस्फोट घडवून आणू,' असा थेट आणि जीवघेणा इशारा या ई-मेलमध्ये देण्यात आला होता. ई-मेल मिळताच जिल्हाधिकारी प्रशासनाने क्षणाचाही विलंब न करता पोलीस अधीक्षकांना तातडीची माहिती दिली. धमकीचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून संपूर्ण जिल्हाधिकारी कार्यालय तात्काळ रिकामे केले. अधिकारी, कर्मचारी, नागरिकांना इमारतीबाहेर सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. सध्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसर पूर्णपणे सील करण्यात आला आहे. वृत्तलिहेस्तोवर दू. २ वाजेपर्यंत पोलिसांचे सर्च मोहिम सुरु होती. त्यामुळे प्रशासकीय कामकाज मात्र थांबले होते. सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मुख्य इमारतीच्या बाहेर काढण्यात आले होते.

तपासासाठी विशेष पथके तैनात करण्यात आले आहे. घटनास्थळी मोठ्या प्रमाणात सुरक्षायंत्रणा दाखल झाली आहे. बॉम्ब शोधक व नाशक पथक, श्वान पथक, दहशतवादविरोधी पथक, पोलीस दल, अग्निशमन विभाग व रुग्णवाहिका या तत्काळ घटनास्थळी दाखल झाल्या आहे. कार्यालयातील प्रत्येक मजला, कक्ष, कपाटे, वाहनतळ आणि आजूबाजूच्या परिसराची कसून तपासणी सुरू आहे. धमकीचा ई-मेल नेमका कुठून आला? कोणत्या आय पी अ‍ॅड्रेसवरून पाठवण्यात आला आणि यामागे कोण आहे याचा शोध घेण्यासाठी सायबर सेल पूर्ण क्षमतेने सक्रिय झाला असून, तांत्रिक तपास युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आजूबाजूचा संपूर्ण परिसर पोलीस बंदोबस्ताखाली असून, सर्वसामान्य नागरिकांना प्रवेशास सक्त मनाई करण्यात आली आहे. शहरातील सुरक्षा व्यवस्थेतही वाढ करण्यात आली आहे.

### खोडसाळपणा की गंभीर कट

ही धमकी एखाद्या विकृत मानसिकतेतून केलेला खोडसाळ प्रकार आहे, की प्रशासनाला लक्ष्य करणारे मोठे षड्यंत्र, याचा तपास पोलीस करत आहेत. मात्र, या घटनेमुळे प्रशासकीय वर्तुळात प्रचंड तणाव निर्माण झाला असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. अकोल्याच्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीला बॉम्बस्फोटाची धमकी मिळणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.

## उच्च न्यायालयात बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी

**मुंबई:** मुंबई उच्च न्यायालयासह मुंबईतील सर्व न्यायालयांमध्ये बॉम्बस्फोट घडवून आणण्याची धमकी आल्यामुळे खळबळ उडाली आहे. यासंदर्भातली माहिती मिळताच पोलिसांकडून तातडीने पावलं उचलण्यात आली. मुंबई पोलिसातील सूत्रांनी यासंदर्भात दिलेल्या माहितीनुसार एका ई-मेलमधून ही धमकी देण्यात आली आहे. हा ई-मेल नेमका कुणी पाठवला? त्यात किती तथ्य आहे? यासंदर्भात अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नसून त्याबाबत सविस्तर तपास केला जात आहे. दरम्यान, किला कोर्ट व वांद्रे कोर्टाचा या ई-मेलमध्ये उल्लेख असल्याचं सांगितलं जात आहे.

# माजी आमदार प्रज्ञा सातव यांचा भाजपमध्ये प्रवेश !

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**मुंबई:** काँग्रेसचे माजी खासदार स्वर्गीय राजीव सातव यांच्या पत्नी तथा माजी आमदार प्रज्ञा सातव यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा थांबल्या. सातव यांनी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत प्रवेश केला. मागील दोन दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांवर अखेर शिक्कामोर्तब झाले. काँग्रेसचे नेते स्व. राजीव सातव यांच्या पत्नी प्रज्ञा सातव यांनी गुरूवारी भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत सातव यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी त्यांनी काँग्रेसमधून भाजपमध्ये येण्यामागची भूमिकाही मांडली. काँग्रेस सदस्यत्वासह आमदारकीचा राजीनामा देत प्रज्ञा सातव यांनी आज भाजपमध्ये प्रवेश केला. भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर प्रज्ञा सातव म्हणाल्या, 'विकास कामांसाठी, कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव आणि राजीव सातव यांचं स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही सगळेजण भारतीय जनता पक्षाच्या परिवारात आलो आहोत. मी आताच जाऊन विधानभवनात राजीनामा दिला आहे.




आरआरसी नेटवर्कचे संस्थापक संचालक प्रदीप उपाख्य बंडूभाऊ देशमुख हे वाढदिवशी कुटुंबीयां समवेत केक कापताना. बुधवारी बंडूभाऊ देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देवून त्यांचे अभिष्ठचिंतन केले. यावेळी ईपेपरचे लॉचिंग करण्यात आले.

# एलसीबीने एकास तीन हजारांची लाच घेताना रंगेहात पकडले !

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**अकोला :** शासनाच्या वतीने आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान योजनेंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याला ५० हजार रूपयांचे अर्थसहाय्य दिल्या जाते. सदर अनुदान काढण्यासाठी जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातील शैलेंद्र तुळशीराम बगाटे व्यवसाय एजन्ट (खासगी शिक्षक) यास ३ हजार रूपयांची लाच घेताना रंगेहाथ अटक केली. सदर कारवाई अकोला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बुधवारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर केली आहे.

शासनाच्या आंतरजातीय विवाह प्रोत्साहनपर अनुदान योजनेंतर्गत आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्याला ५० हजार रूपयांचे अर्थसहाय्य दिल्या जाते. याबाबत विचारपूस करण्यासाठी तक्रारदार हे समाज कल्याण विभागात गेले असता कार्यालयात उपस्थित असलेले शैलेंद्र बगाटे यांनी सदर कामाकरिता तक्रारदार यांना ५ हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली. परंतु, तक्रारदारास शैलेंद्र बगाटे यांनी मागणी केलेली लाच रक्कम द्यायची नसल्याने त्यांनी १७ डिसेंबर रोजी एसीबीकडे तक्रार केली. या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्यात आली असून, बगाटे याने लाच मागितल्याचे स्पष्ट झाले. पहिला टप्पा म्हणून ३ हजार रूपयांची लाच रकमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. तसेच दूसरा टप्पा २ दोन हजार रूपये नंतर स्वीकारण्याची तयार दर्शविली.

या कारवाईप्रकरणी आरोपी शैलेंद्र तुळशीराम बगाटे (४३) रा. कैलास टेकडी, खदान याने लाच रक्कम स्वीकारल्याने त्यास ताब्यात घेऊन पोलीस स्टेशन सिटी कोतवाली येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलमान्वये गुन्हा दाखल केला. ही कारवाई एसपी बापू बांगर, एएसपी सचिन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनात डीवायएसपी मिलींदकुमार बहाकर, पोलीस निरीक्षक प्रविण वेरूळकर, शुध्दोधन इंगळे, राहुल इंगळे, डिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, अर्चना घोडेस्वार, संदीप टाले, असलम शेख, गोपाल किरडे व सलीम खान यांनी केली आहे.

# माणिकराव कोकाटेंना पोलिसांनीच पळवलंय – प्रकाश आंबेडकर

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**कोल्हापूर :** राज्यात मंत्री गायब होत असतील, तर जनतेने काय करायचे? माणिकराव कोकाटे यांना पोलिसांनीच पळवले. मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून लपवलेले आहे, असा आरोप वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी आज येथे केला.

कायद्याचा अपमान होणार नाही, याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काळजी घ्यावी, असेही ते म्हणाले.

ते म्हणाले, ''मंत्र्यांवर न्यायालयात आरोप सिद्ध होतात; मात्र त्यांच्यावर कारवाई होत नाही. मंत्रीच पोलिसांना सापडत नाहीत; मग जनतेने काय करायचे? मुख्यमंत्र्यांच्या सांगण्यावरून मंत्र्यांना लपवले आहे, अशी परिस्थिती आहे. दोन वर्षे शिक्षा झाली, तर मताचा अधिकार संपुष्टात येतो. यावरून गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात येते.

### चव्हाणांनी संकेत पाळावेत

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या विधानाबाबत अ‍ॅड. आंबेडकर म्हणाले, ''राजकारणात असताना सगळयांना सगळया गोष्टी माहिती असतात; मात्र ज्या गोष्टी देशाच्या हिताच्या नसतात, त्या सार्वजनिक मांडायच्या नसतात. पृथ्वीराज चव्हाण यांनी हे संकेत पाळणे गरजेचे आहे.''

## अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**सांगली :** महाराष्ट्राला हादरवून टाकणारी एक धक्कादायक घटना सांगली जिल्ह्यात घडली आहे. इथं एका अल्पवयीन मुलीवर दोन जणांनी सामूहिक अत्याचार केला आहे. दोन्ही आरोपी हे पोलीस रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार आहेत. आरोपींनी पीडित मुलीचं अपहरण करून तिला गावाजवळील एका शेतात घेऊन जात तिच्यावर लैंगिक अत्याचार केला आहे. आरोपी एवढ्यावरच थांबले नाहीत, तर त्यांनी पीडितेचे कपडे घेऊन पळ काढला. यामुळे मुलीला विवस्त्र अवस्थेत शहरापर्यंत पायपीट करावी लागली आहे. ही घटना सांगलीच्या ईश्वरपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. अमानुष अत्याचाराची ही घटना उघडकीस येताच पोलिसांनी तातडीने तपासाची चक्र फिरवत दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

# शिवसेनेची नवी फळी सज्ज उद्धव ठाकरेंचा आदेश

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**अकोला:** आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने संघटनात्मक बांधणीला वेग दिला असून, अकोला जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांच्या नवीन नियुक्त्या गुरुवारी जाहीर केल्या आहेत. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार या निवडी करण्यात आल्याची माहिती शिवसेना मध्यवर्ती कार्यालयातून देण्यात आली आहे. यामध्ये अनुभवी कार्यकर्त्यांसह युवा चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली आहे. आशिष गावंडे (शहरप्रमुख अकोला पश्चिम), सुरेंद्र विसपुते (उपजिल्हाप्रमुख अकोला पश्चिम विधानसभा), राजू चव्हाण (शहरसंघटक अकोला पश्चिम), प्रशांत मानकर ( शहर पश्चिम), शिवा मोहोड (जिल्हासंघटक (शेतकरी सेना) अकोला पूर्व, अकोट विधानसभा, गंगाधर ढोरे ( जिल्हासंघटक बाळापूर, अकोट, मूर्तीजापूर विधानसभा), भूषण भिरड (जिल्हासंघटक अकोला पूर्व, अकोला पश्चिम), अश्विन पांडे (जिल्हा समन्वयक अकोला पूर्व, अकोला पश्चिम) यांची नियुक्ती केल्या गेली आहे. या नियुक्त्यांचे पत्र शिवसेना सचिव विनायक राऊत यांनी अधिकृतपणे प्रसिद्ध केले आहे.

# बिबट्यासह 4 पिल्ले आढळली !

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**बाळापूर :** अकोला ते शेगाव या दिंडी मार्गावरील कसुरा नजीक असलेल्या संत गजानन महाराज मंदिराजवळ बिबट्यासह ४ पिल्ले आढळून आली असून, ४ पैकी १ पिल्लू रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना आढळून आले. बिबट्या व ३ पिल्ले पुढे निघून जाण्यात यशस्वी झाले. मात्र ४ पैकी बिबट्याचे १ पिल्लू नागरिकांनी पकडले. या संदर्भात माजी सरपंच विठ्ठल दही यांनी वन विभाग व उरळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर वन विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच उरळ पोलिस स्टेशनचे अधिकारी, कर्मचारी कसुरा येथे पोहोचले. तर पकडून ठेवलेल्या बिबट्याच्या बछड्यास वन विभागाने ताब्यात घेतले. यावेळी माजी सरपंच विठ्ठल दही, सुभाष खेडकर, सुनील वासनकर, अवि ईधोळ, राजू साटोटे, दिलीप गव्हाळे, मुजीलाल कोरकू उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगावी असे आवाहन बाळापूर तहसीलदार वैभव यांनी केले.

# वंचित महाविकास सोबत जाणार का ? काँग्रेस वंचित एकत्र येण्याचे संकेत

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला:** काँग्रेस आणि वंचित यांच्यातील संभाव्य घरोबा हा महाविकास आघाडीत वंचितची एन्ट्री करणारा ठरणार आहे. पण, ही एन्ट्री राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला मान्य असेल काय आणि शिवसेना (उबाठा) ला मान्य असेल काय अशी विचारणा होत आहे. स्थानिक पातळीवर काँग्रेस आणि वंचित एकत्र लढू पाहत आहे. त्या विषयीचा निर्णय स्थानिक पातळीवर होईल देखील पण, त्याच वेळी राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना (उबाठा) यांची भूमिका काय असेल असा ही प्रश्न आहे. महापालिका निवडणुकीत वंचितने महाविकास आघाडीत स्थानिक पातळीवर सहभागाची भुमिका घेतली तर सर्वात मोठा फटका हा भाजप किंवा महायुती ला होऊ शकतो. त्याच वेळी भाजप चे कार्यकर्ते महायुती नको म्हणत असताना पक्षांतर्गत पातळीवर महापालिका निवडणुकीत महायुती स्वतंत्र असा देखील निर्णय अद्याप झाला नाही.

अशा परिस्थितीत वंचित सह महाविकास आणि महायुती यांच्यात थेट लढत झाली तर राजकीय आराखडे बांधणे हे कठीण होईल. त्याच बरोबर स्थानिक पातळीवर उमेदवाराच्या नेतृत्व आणि जनसंपर्कावर ही निवडणुक अधिक चुरशीची होईल हे मात्र नक्की.

अकोल्यात जिल्हा परिषदेत वंचितची सत्ता असते. महापालिकेत भाजपची सत्ता असते. हे गेल्या अनेक निवडणुकांचे निकालावरुन स्पष्ट होते. पण, शिवसेनेच्या दोन शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन राष्ट्रवादी काँग्रेस झाल्याने राज्यातील सत्ता समीकरण आणि राजकारण ढवळून निघाले आहे. तसेच ते अकोल्यात देखील झाले आहे. भाजप, काँग्रेस, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), शिवसेना (उध्दव ठाकरे गट), वंचित, मनसे आणि प्रहार असे काय ती राजकीय पक्ष तुर्तास अस्तित्वात आहे. सर्वच राजकीय पक्षांना मुंबई महापालिका निवडणुकीत सर्वाधिक रस आहे.

असे असताना राज्यातील इतर महापालिका जसे पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या बड्या महापालिका निवडणुकीत महायुती आणि महाविकास अशा लढती थेट होऊ शकतात. पण, ज्यांचे आर्थिक बजेट जास्त नाही अशा ठिकाणी स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची ही निवडणुक असते. नेत्यांना फक्त महापालिकेत सत्ता आणल्याचे समाधान असते. राज्यातील राजकीय परिस्थिती पाहता चढाओढ सगळीकडे आहे. त्यामुळे प्रत्येक महापालिकेत सत्ता ही राजकीय पक्षांसाठी महत्वाकांक्षा ठरत आहे. याच महत्वाकांक्षेतून ड वर्ग महापालिकेत देखील राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडीच्या पक्षांना सत्ता पाहिजे आहे.

### पैशाची लुट होईल काय

नगर पालिका निवडणुकीत कोट्यावधीचे झालेले वाटप आणि राजकीय पक्षांना आलेला पैसा पाहता महापालिका निवडणुकीत देखील चौपट पैसा प्राप्त होणार आहे. सत्तेत असलेल्या राजकीय पक्षांजवळ पैशाचा महापुर असतो. भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांच्या प्रचार प्रसारासाठी मोठा निधी मिळेल असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी व्यक्त केला आहे. अशा परिस्थितीत सामान्य कार्यकर्ता खुश ठेवण्यात हे दोन्ही पक्ष यशस्वी होती. पण, इतर पक्षांची ही निवडणूक उमेदवाराच्या आर्थिक शक्तीवर होणार आहे. त्यामुळे निवडणुकीत पैसा चालतो की, कार्यकर्ता हे पाहण्यासारखे असेल. अकोल्यात नेमके काय होते हे पाहण्यासारखे असेल.

### वंचित मध्ये तीव्र मतभेद

वंचितचे नेते अकोला पुर्वसाठी वेगळी कार्यकारणी घोषित केल्यानंतर वंचित मध्ये मतभेद समोर आले आहे. वंचित च्या जिल्हाध्यक्ष आणि इतर नेत्यांनी वंचित उमेदवारांच्या मुलाखती घेत राजकीय आघाडी घेतली असताना नवे पुर्व चे शहर अध्यक्षांना त्यात स्थान नसल्याचे चित्र आहे. वंचितमध्ये मतभेद असताना पक्ष पातळीवर काँग्रेस सोबत जाण्याचा निर्णय कोण घेणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. जिल्हाध्यक्ष व शहर अध्यक्ष यांच्या स्वतंत्र बैठकांमुळे वंचितमध्ये एकवाक्यता नसल्याचे चित्र आहे. त्याचा फटका निवडणुकीत बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# महानगरपालिका निवडणुकीसाठी युवा स्वाभिमान पार्टीकडून लढणाऱ्या इच्छुक उमेदवारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**अमरावती :** ४३८ इच्छुक उमेदवारांनी अर्जाची उचल पूर्ण अंतीम तारीख संपूष्टात आली असून आता कोणत्याही इच्छुक उमेदवारांना युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने अर्ज उचलता येणार नाही.

दि. १८, १९ आणि २० डिसेंबर रोजी अर्ज उचललेल्या इच्छुक उमेदवारांच्या घेतल्या जाणार आहे. मुलाखती राष्ट्रीय अध्यक्ष निळकंठराव कात्रे, मार्गदर्शक, सुनीलजी राणा, प्रा.अजय गाडे, नंदेशजी अंबाडकर, शैलेंद्रजी कस्तुरे, जयंतराव वानखडे, हरिषजी चरपे, कमलकिशोरजी मालानी, शिवदासजी घुले, संजय हिंगासपुरे, सोनाली नवले, ज्योती सैरिसे, संजय मुनोत, मनोज चांदवानी, प्रा.सतीश खोडे, प्रा.संतोष बनसोड, गंगाधर आवारे, बाळु इंगोले अवी काळे, या निवडणुक मुलाखत समितीकडुन होणार इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जात आहे. युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळाला आहे. पक्षाकडून सुरू करण्यात आलेल्या अर्ज उचल प्रक्रियेत एकूण ४३८ इच्छुक उमेदवारांनी अर्जाची उचल केली असून आता ही प्रक्रिया अधिकृतपणे पूर्ण करण्यात आली आहे. पक्षाच्या निर्णयानुसार, आता कोणत्याही नव्या इच्छुक उमेदवारांना युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने अर्ज उचलता येणार नाही, अशी माहिती पक्षाच्या सूत्रांनी दिली आहे. अर्ज उचल प्रक्रियेला मिळालेला प्रतिसाद पाहता पक्षामध्ये निवडणुकीबाबत मोठे उत्साहाचे वातावरण आहे.

युवा स्वाभिमान पार्टीचे अध्यक्ष आ.रवी राणा यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाने संघटनात्मक तयारीला वेग दिला असून, पुढील टप्प्यात उमेदवारांची निवड प्रक्रिया राबवली जाणार आहे. त्यानुसार, १८, १९ आणि २० डिसेंबर रोजी अर्ज उचललेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या जाणार आहेत. या मुलाखतीनंतर पक्षाकडून अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर युवा स्वाभिमान पार्टीने ठोस तयारी सुरू केली असून, शहरातील विकास, युवकांचे प्रश्न आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांवर भर देत निवडणूक लढवली जाणार असल्याचे पक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# अर्जुन नगर, नलिनीकृष्णपुरम व राष्ट्रसंत कॉलनीत सांडपाणी व्यवस्थेचा बोजवारा

♦ नाली नाही, अंडरग्राउंड पाइप नाही; स्वच्छता प्रशासनाने नव्हे तर नागरिकांनी केली

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**अमरावती :** अर्जुन नगर परिसरातील नलिनीकृष्णपुरम व राष्ट्रसंत कॉलनी या दोन्ही वसाहतींमध्ये सांडपाणी व्यवस्थेचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून परिस्थिती आता अत्यंत गंभीर टप्प्यावर पोहोचली आहे. या भागातील घरांमधून बाहेर पडणारे सांडपाणी मुख्य नालीमध्ये जाण्यासाठी ना नियोजित उघडी नाली उपलब्ध आहे, ना अंडरग्राउंड ड्रेनेज पाइपलाइन टाकण्यात आलेली आहे. परिणामी सांडपाणी मोकळ्या जागेत, झुडपांमध्ये व रस्त्यालगत साचत असून परिसरात भीषण अस्वच्छता निर्माण झाली आहे. साचलेल्या सांडपाण्यामुळे चिखल, प्लास्टिक व घरगुती कचऱ्याचे ढीग तयार झाले आहेत. संपूर्ण परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून डासांचे व इतर कीटकांचे प्रजनन मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया, टायफॉईडसारख्या आजारांचा धोका वाढला आहे. लहान मुले, वृद्ध नागरिक, महिला व आजारी व्यक्ती यांचे आरोग्य थेट धोक्यात आले आहे. या परिस्थितीत सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे महानगरपालिकेने आजवर या भागात कोणतीही स्वच्छता मोहीम राबवलेली नाही. हे प्रशासनाच्या अपयशाचे जिवंत उदाहरण असून, मूलभूत नागरी सुविधा देण्यात महानगरपालिका सपशेल अपयशी ठरत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. स्थानिक रहिवाशांनी वारंवार स्वच्छता विभाग, ड्रेनेज विभाग तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करूनही कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. तात्पुरतेही उपाय न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व संताप व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या काळात ही समस्या आणखी भयावह होण्याची शक्यता असून साचलेले सांडपाणी घरांमध्ये शिरण्याचा धोका आहे. नलिनीकृष्णपुरम व राष्ट्रसंत कॉलनीतील नागरिकांची ठाम मागणी आहे की, महानगरपालिकेने तातडीने या संपूर्ण परिसराची जबाबदारी घ्यावी, साचलेले सांडपाणी व कचरा पूर्णपणे हटवावा आणि या दोन्ही वसाहतींचे सांडपाणी मुख्य नालीशी जोडण्यासाठी योग्य उघडी नाली किंवा अंडरग्राउंड ड्रेनेज पाइपलाइन त्वरित टाकावी. तसेच भविष्यात अशी परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी कायमस्वरूपी व शास्त्रीय पद्धतीने ड्रेनेज व्यवस्था उभारावी. प्रशासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष न दिल्यास नागरिकांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडावे लागेल, असा स्पष्ट इशाराही स्थानिक रहिवाशांनी दिला आहे.

# राजकीय पक्ष लागले जि. प., पं. स. निवडणुकीच्या तयारीला

♦ इच्छुक उमेदवारांनी थोपटले दंड; गट, गणात गाठीभेटींवर भर

प्रतिनिधी १८ डिसेंबर

दर्यापूर : नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीची रणधुमाळी जिल्ह्यातील बऱ्याच ठिकाणी संपली असली तरी अद्याप निवडणुकीचा निकाल बाकी आहे. जिल्ह्यात अंजनगाव नगरपालिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दर्यापूर सह इतर ठिकाणीही काही ठिकाणी निवडणूक आहे. या महिन्यात कुठल्याही क्षणी जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे प्रमुख राजकीय पक्षाच्या इच्छुकांनी गट व गणात दौरे सुरू केले आहेत. शहरानंतर आता ग्रामीण भागात निवडणुकीचे वातावरण निर्माण होत आहे. सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्व निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यानंतर डिसेंबर महिन्यात नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका पार पडल्या आहेत. नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. यापूर्वीच गट व गणाचे आरक्षण जाहीर झाले आहे. त्यामुळे इच्छुक निवडणुकीची तयारी करत आहेत. अनेक महिन्यांपासून प्रमुख राजकीय पक्षाचे इच्छुक उमेदवार गट आणि गणातील गावात जाऊन ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेत आहेत. कार्यकर्त्यांचे नेटवर्क तयार करत आहेत. सोशल मीडियावर सुद्धा सक्रिय आहेत डिसेंबर महिन्यात निवडणूक लागण्याची शक्यता असल्यामुळे विविध धार्मिक कार्यक्रम विविध स्पर्धा घेऊन इच्छुक उमेदवार गट आणि गणात वातावरण निर्मिती करत असल्याचे चित्र निर्माण आहे.

**कार्यकर्त्यांच्या बैठकांवर भर**

◆ तालुका पातळीवर राजकारण करणाऱ्या दुसऱ्या फळीतील नेत्यांना जिल्हा परिषदेमध्ये संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वसाधारण गटात दुसऱ्या फळीतील मातब्बर नेते मंडळी उतरणार आहेत. प्रमुख राजकीय पक्षाकडून जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीची तयारी म्हणून कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. काँग्रेस गट आणि गणात इच्छुकांची संख्या मोठी आहे तसेच ग्रामीण भागात काँग्रेस कार्यकर्त्यांची फळी मजबूत असल्यामुळे या पक्षानेदेखील तयारी सुरू केली आहे. दरम्यान, नगरपालिका निवडणुकीत महायुती, महाविकास आघाडीने स्वतंत्र निवडणूक लढवली होती. आगामी निवडणूकीत महायुती, महाविकास आघाडी जि. प., पं. स. निवडणुकी दिसणार असल्याची चर्चा आह

**पालिका निकालाकडे सर्वांचे लक्ष**

◆ नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत नगराध्यक्षासह नगरसेवकांच्या जागेसाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले आहे. काँग्रेस आणि भाजपा काट्याची टक्कर झाल्यामुळे निकालाकडे सगळ्यांच्या नजरा लागल्या आहेत. नगरपालिकेचा निकाल लागल्यानंतर ग्रामीण भागात या निकालाचा परिणाम दिसणार असल्याची चर्चा आहे.

# घातक शस्त्रासह इंस्टाग्रामवर फोटो व्हायरल करून दहशत पसविणाऱ्या इसमास शस्त्रासह अटक



**अमरावती :** गुन्हे शाखा अमरावती शहर यांना गुप्त माहीती मिळाली की, एक इसम हा काही दिवसा पासुन शस्त्रासह इंस्टाग्रामवर फोटो अपलोड करून सोशल मिडीयावर प्रसारीत करीत आहे. सदर इसम आज दिनांक १७/१२/२०२५ रोजी जवेड नगर अमरावती येथे शस्त्रासह उभा आहे.. अशा मिळालेल्या माहीती वरून मा. पो.नि.. संदीप चव्हाण यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर इसम नामे अभिषेक उध्दव मेश्राम वय २४ वर्ष रा. जेवड नगर अमरावती यास ताब्यात घेवुन त्याचे ताब्यातुन एक चायना चाकु, जप्त करून त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन राजापेठ येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. सदर ची कारवाई. पोलीस आयुक्त . राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे पोलीस उपायुक्त . श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे , सपोआ गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक . संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि महेश इंगोले, पोलीस अंमलदार - गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, संदिप खंडारे, नईम बेग, विकास गुडदे, सागर ठाकरे, योगेश पवार यांनी केली आहे.

# दिवाणी न्यायालय धारणीत पार पडली राष्ट्रीय लोक अदालत

प्रतिनिधी १८ डिसेंबर

♦ दिवाणी व फौजदारी न्यायालय



**धारणी:** (जयकिसन इंगळे) धारणी येथे शनिवार दिनांक १३ डिसेंबर रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यांत आले होते. लोक अदालती मध्ये एकुण दोन पॅनल ठेवण्यांत आले होते. त्यात पॅनल क्रं. १ वर डी. जे. पंडित दिवाणी न्यायाधीश क स्तर धारणी तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती धारणी हे होते. तसेच पॅनल क्रं. २ वर ए. ए. चव्हाण सह दिवाणी न्यायाधीश क स्तर धारणी हे होते. त्याचप्रमाणे लोकअदालती मध्ये रक्तदान शिबीराचे भव्य आयोजन केले होते. त्याकरीता उपजिल्हा रुग्णालय धारणी यांचे योगदान लाभले. त्याच प्रमाणे प्राथमिक आरोग्य केंद्र साद्राबाडी येथील कर्मचारी यांनी बालविवाह कायदयाविषयक लोक जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत स्थानिक भाषेत पथनाट्य सादर केले. आणि व्ही. एन. कॉलेज धारणी येथील विद्याथ्यर्थ्यांनी उत्सफूर्तपणे सहभाग घेतला. लोक अदालती मध्ये दिवाणी व फौजदारी प्रकरणे मिळून एकूण ४५२१ प्रकरणे ठेवण्यांत आली होती त्यातील ८२९ प्रकरणे निकाली काढण्यांत आली, त्यामध्ये एकुण ४७ लक्ष रुपये एवढ्या रक्कमेच्या प्रकरणांचा निपटारा करण्यांत आला. तसेच लोक अदालतीमध्ये वैवाहिक प्रकरणांचा सुध्दा निपटारा करण्यांत आला व अशा तडजोड प्रकरणांतील पती पत्नी यांना थेट न्यायालयातून सामोपचाराने नांदावयासाठी त्यांच्या घरी पाठविण्यांत आले. तसेच भविष्यात त्यांचा संसार फुलावा या उद्देशाने अशा जोडप्यांना कुंडीसह झाड भेट देण्यांत आले. पूर्ण लोक अदालतीचे कामकाज डी. जे. पंडित दिवाणी न्यायाधीश क. स्तर धारणी तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती धारणी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. सदर लोक अदालतीला पी भिसे व पी. एम. राठोड, ग्राम पंचायत कर्मचारी वृंद, पोलीस कर्मचारी वृंद, बँक कर्मचारी वृंद यांचे सहकार्य लाभले.

# राजापेठ पोलिसांनी केली दारू जप्त



प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अमरावती :** राजापेठ हद्दी मध्ये पेट्रोलिंग करीत असताना मिळालेल्या गुप्त माहिती वरून आरोपी विजय सुनील चौरगडे वय २५ रा जनता कॉलनी अमरावती हा दारू ची वाहतूक करताना मिळून आला वरून त्याच्या कडून देशी दारू कि अ १३४० व मो. सा कि. अ. ८००००असा ९३४० एकून रु माल जप्त करण्यात आला. त्याचा विरुद्ध ङपो.स्टे.राजापेठ येथे कलम ६५(अ)(ई) मा दा का अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येत आहे.

# पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये क्रीडा महोत्सवास सुरुवात



प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल मध्ये तीन दिवसीय क्रीडा महोत्सवाला आज सुरुवात झाली आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी . अनिल इंगळे, उपायुक्त अमरावती महानगरपालिका डॉ. नरेंद्र वानखडे , शाळेचे प्राचार्य सचिन दुर्गे व उपप्राचार्या सोनल निस्ताने यांच्या उपस्थितीत मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन व क्रीडा मशाल पेटवत उद्घाटन करण्यात आले. या क्रीडा महोत्सवात विविध मैदानी खेळ विद्यार्थी खेळणार असून ज्यामध्ये रनिंग रेस, पोटॅटो रेस, लिंबू चमचा, सॅक रेस, बलून रेस, बास्केटबॉल, गोळा फेक, रस्सीखेच, लेझीम योगा असे विविध खेळांचे समावेश आहे. वर्ग नर्सरी ते दहावीचे चे विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्ग आठवीचे विद्यार्थी आयुशी जयस्वाल, अनिमेष मोहोड, भूमी श्रीरामे, आर्यन अंबाडकर तसेच क्रीडा स्पर्धेच्या क्षेत्राची संचालन प्रवीण मेंढे सर यांनी केले व शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# वन्यप्राणी करताहेत पिकांचे नुकसान

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**खामगांव:** दिवसभर शेतात काम करून ही वन्यप्राणी पिकांचे नुकसान करत असल्या कारणाने रात्री शेतकरी झोप घेउ शकत नाही आहे, त्याना रात्रभर शेतात पिक वाचवण्यासाठी राखण करावी लागते. त्यामुळे ऐन थंडीच्या दिवसात चांगलीच दमछाक होत आहे.

यावर्षी मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले आहे, हे नुकसान भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांनी आता रब्बीचा हंगाम हक्काचा असल्याने गहू, हरभरा या पिकांची पेरणी केली आहे, या सर्व पिकाला रोही आणि रानडुक्कर या वन्य प्राण्यांपासून चांगलाच धोका निर्माण झाला आहे.

शेतामध्ये राखण केली नाही तर डुकराचे कळप रात्री शेतामध्ये येतात. एकर एकर मधील पीक क्षणार्धात उद्ध्वस्त करतात. त्यामुळे शेतकरी चांगलाच हादरला आहे. मेहनत घेतली तरच आपल्याला पीक मिळेल. नाहीतर खरीप पिकाचे घेतलेले कर्ज कशाने फेडायचे आणि कुटुंबाचा वर्षभर गाडा कशाने चालवायचा? हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकला आहे. या वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. शेतकऱ्यांना मोफत शेताला लावण्यासाठी झटका बॅटरी, काटेरी कुंपण, तार उपलब्ध करून द्यावी तरच पिके वाचविण्या मध्ये हातभार लागणार आहे. अन्यथा, शेतकऱ्यांच्या समस्या कायमच राहणार आहेत. पिकांची नासाडी करण्यासोबतच काहींच्या प्राणावर बेतण्याचे अनेक प्रकार घडले आहेत. रानडुकरांची नेहमीच धास्ती असते. वनविभागाकडून काहीच उपाययोजना झालेल्या नाहीत.

◆ खरिपातील तूर तसेच रब्बीतील गहू, हरभरा पिकांमध्ये वन्यप्राणी धुमाकूळ घालत आहेत. त्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.
शरद मोहे, शेतकरी

# विवाहितेचा छळ; पतीसह सासरच्या चौघांविरोधात गुन्हा दाखल

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**खामगाव :** विवाहित महिलेचा मानसिक व शारीरिक छळ करून हुंड्याची मागणी केल्याच्या आरोपावरून खामगाव शहर पोलिस ठाण्यात पतीसह सासू-सासरे व नणंद अशा चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी शिवानी मयूर बन्सोड (रा. समता कॉलनी, खामगाव, जि. बुलढाणा) यांनी तक्रार दाखल केली आहे. आरोपींमध्ये पती मयूर रमाकांत बन्सोड (२९), सासरे रमाकांत धोंडोपंत बन्सोड (६०), सासू आशा रमाकांत बन्सोड (५५) व नणंद भक्ती अभिषेक चिंतामणी (२७) यांचा समावेश आहे. सर्व आरोपी शिवाजीनगर, पंचायत समितीमागे, गंगापूर (ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) येथील रहिवासी आहेत. तक्रारीनुसार, १५ मे २०२२ पासून आतापर्यंत आरोपींनी फिर्यादीचा वारंवार मानसिक व शारीरिक छळ केला. माहेरच्यांशी संबंध तोडण्याचा दबाव टाकणे, तीन तोळे सोने व चारचाकी वाहनाची मागणी करणे, तसेच मागण्या पूर्ण न झाल्यास सांभाळ न करण्याची धमकी देणे, असे आरोप तक्रारीत नमूद आहेत. शिवीगाळ व धमकावण्याचे प्रकारही झाल्याचे फिर्यादीने तक्रारीत म्हटले आहे. तक्रारीवरून उपरोक्त आरोपी विरुद्ध भारतीय दंड संहिता कलम ४९८-अ, ३२३, ५०४, ५०६ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आंदोलनाच्या धास्तीने 67 अतिवृष्टीधारकांच्या खात्यात 4 लाख 67 हजार रुपये जमा

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**खामगाव :** मलकापुर तालुक्यातील ग्राम विवरा येथे १६ सप्टेंबर २५ रोजी ढगफुटी होऊन अतिवृष्टी झाली अतीवृष्टीने शेतातील उभी पिके वाहून शेतजमीनी खरडून गेल्या रहिवासी ग्रामस्थांचे घरांत पाणी गेल्याने अन्नधान्यासह जिवनावश्यक साहित्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले ?नुकसानीची पाहणी करण्याकरीता पालकमंत्री सावकारे, आ.चैनसुख संचेती, उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, तत्कालीन तहसीलदार राहुल तायडे तलाठी मंडळ अधिकारी आदींनी भेटी देत पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन देण्यात आले चार महिने उलटून सुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे न आल्याने संतप्त शेतकऱ्यांनी याबाबतची माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रमुख गजानन ठोसर , शिवसेना विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत, शहर प्रमुख हरिदास गणबास सह शिवसेना पदाधिकाऱ्यांना दिली. ग्रामस्थांसह शुक्रवार रोजी तहसील कार्यालय आवारात पाल ठोकून झिंगे बोंबील भुजो आंदोलन करण्याचा इशारा उपविभागीय महसूल अधिकारी संतोष शिंदे यांना दि.१५ डिसेंबर रोजी निवेदनाद्वारे दिला होता. शिवसेना (उबाठा)च्या या अनोख्या आंदोलनाच्या धास्तीने दि.१७ डिसेंबर २५ रोजी दुसऱ्याच दिवशी तब्बल ०४ लाख ६७ हजार रुपये ६७ अतीवृष्टीधारकांच्या खात्यात जमा झाले असल्याची माहिती देत उर्वरित नुकसानग्रस्तांच्या खात्यात दोन दिवसात पैसे जमा होणार असल्याचे तहसील प्रशासनाने सांगितले. दोन दिवसांत उर्वरित अतीवृष्टीधारकांच्या खात्यात पैसे जमा न केल्यास तहसील कार्यालय आवारात पाल ठोकून झिंगे बोंबील भुजो आंदोलनावर ठाम असल्याचे शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांनी सांगितले आहे.

सिटी न्यूज अकोला

गुरूवार, दि. १८ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# शुक्रवारी विहिंप-बजरंग दलातर्फे शौर्य संचलन व धर्मसभा

**तेल्हारा :** विश्व हिंदू परिषद तथा बजरंग दल तेल्हाराच्या वतीने शुक्रवार, १९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता भागवत मंगल कार्यालयात विशाल धर्मसभेचे आयोजन करण्यात आले आहे. याचवेळी गावातील मुख्य मार्गाने बजरंग दलाचे शौर्य संचलन निघणार आहे.

बजरंग दलाचे विदर्भ प्रांत सहसंयोजक सूरज भगेवार हे प्रमुख वक्ते असून धर्मसभेला प्रांत सहमंत्री गणेश काळकर, विश्व हिंदू परिषद अध्यक्ष अकोला ग्रामीण ॲड. श्याम वक्टे, बजरंग दल अकोला विभाग संयोजक हरी ओम पांडे, अकोला विभाग मंत्री संजय दुबे, जिल्हा संयोजक अकोला ग्रामीण आशिष झाला, जिल्हा मंत्री अकोला ग्रामीण मंगेश अंबाडेकर व इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती विहिंप-बजरंग दलातर्फे देण्यात आली आहे.

# हिवरखेड- अकोट महामार्गाच्या कामात माती व गाळाचा वापर

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**हिवरखेड :** हिवरखेड अकोट महामार्गाच्या कामात काळी, पांढरी मातीचा वापर केला जात आहे असा आरोप केला जात आहे. अडीचशे कोटींच्या निधीतून काम सुरू आहे.

वणी रंभापूर, अकोट, हिवरखेड अडीचशे कोटींच्या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ठ दर्जाचे होत असून या बाबत जागरूक नागरिकांनी आवाज उठविणे सुरू केले आहे. वारखेड हिवरखेड ते अडगाव रोडवरील स्पॉटवर संबंधित कंपनीच्या प्रतिनिधींना बोलावून नागरिकांनी चांगलेच धारेवर धरले आणि निकृष्ट काम निदर्शनास आणून मुरूमा ऐवजी काळी व पांढरी मातीचा, गाळाचा सर्रास वापर होत असल्याने उघड नाराजी व्यक्त केली. त्यावर कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे की सदर वस्तू ही माती नसून लॅब मध्ये टेस्ट केलेला मुरूम आहे असे हास्यास्पद उत्तर दिले. त्यामुळे नागरिकांचा संताप वाढला. सोबतच थातूर मातूर देखावा वगळता कोणत्याही ठोस सुरक्षात्मक उपाय योजना करण्यात आलेल्या नाहीत आणि या रस्त्याचे काम सुरू करण्याचे पूर्वी हजारो वृक्षांची कत्तल करण्यात आली. त्या जागेवर नवीन वृक्षांची लागवड झालेली कोठेच दिसत नाही. त्याबाबत कंपनीने हात झटकले असून आमच्या कंत्राटामध्ये नवीन झाडे लावण्याचा कोणताही उल्लेख शासनाकडून नाही असे स्पष्ट केले. ह्या निकृष्ट कामाबाबत अडगावचे माजी जिल्हा परिषद सदस्य गोपाल कोल्हे, खंडाळाचे माजी सरपंच सतीश देवळे, उपसरपंच मोहन अवचार, परिमल जाधव, विशाल तायडे, सुरेश आप्पा मोदे, तसेच हिवरखेड येथील व्यापारी आनंद बोहरा, अविनाश बोहरा, जितेंद्र माधानी, संजय टावरी, मकसूद अली, संदीप गांधी, पत्रकार धिरज बजाज, सूरज चौबे, शेख जमीर मिस्त्री, यांचे सह विविध गावातील अनेक जागरूक नागरिक आणि प्रवाशी उपस्थित होते. जनतेच्या संयमाचा बांध फुटत चालल्याने यावर आता संबंधित कंत्राटदार आणि एमएसआरडीसीचे अधिकारी संबंधित शासकीय प्रशासकीय अधिकारी आणि लोक प्रतिनिधी काय पाऊले उचलतात याकडे जनतेचे लक्ष लागून आहे.

## निकृष्ट दर्जाचे काम होऊ देणार नाही



### शिंदे सेना आक्रमक

बुधवारी अकोला आणि अकोट येथील शिवसेना शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी हिवरखेड येथे संबंधित कंत्राटदाराच्या आणि देखरेख करणाऱ्या थर्ड पार्टीच्या प्रतिनिधींना घेराव घालत विविध प्रश्नांची सरबत्ती केली. रस्त्यावर टाकलेली माती परत खोदून नियमानुसार मुरूम टाकून योग्य रीतीने काम करावे, अन्यथा काम होऊ देणार नसून निकृष्ट काम सुरूच राहिल्यास शिवसेना स्टाईलने समजावले जाईल असा थेट इशारा शिवसेना शिंदे गट अकोला उपजिल्हाप्रमुख गोपाल म्हैसने, फिरोज पठाण, पप्पू चौधरी, सागर कुटे, महेश बघेरे, गोटू अग्रवाल, अकोला तसेच आकोट येथील मनीष राऊत, अमोल बोरकर, शुभम गावंडे, विक्की घनबहादूर इत्यादींनी संबंधित कंत्राटदाराच्या प्रतिनिधीला दिला.

**निकृष्ट काम होऊ देणार नाही**

उच्च दर्जाचे मुरूम टाकून काम करावे अन्यथा आम्ही हे निकृष्ट काम होऊ देणार नसून नागरिकांसह आंदोलन उभारू.

**गोपाल कोल्हे**, माजी जिल्हा परिषद सदस्य, अडगाव

**कामे नियमानुसार करण्यास सांगितले**

योग्य मुरूम वापरण्याच्या आणि सर्व कामे नियमाप्रमाणे करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**विजय अडचूले**, टेक्निकल ॲडव्हायझर

ही जनतेच्या डोळयात धूळ कंपनीच्या अधिकाऱ्यांनी योग्य मुरूम टाकून काम सुरु करू असे पोकळ आश्वासन दिले. मात्र माती टाकून दबाई सुरूच आहे. हा जनतेसोबत धोका आहे.

**सतीश देवळे**, माजी सरपंच खंडाळा

**प्रत्यक्ष साईटवर जाऊन पाहणी करणार**

नागरिकांच्या तक्रारीनुसार सध्या माती टाकण्याचे काम थांबविण्यात आले असून मी स्वतः शनिवारी प्रत्यक्ष साइटवर येऊन पाहणी करून निर्णय घेणार आहे. तसेच पोपटखेड येथील चांगल्या प्रतीचा मुरूम वापरून रस्त्याचे काम करण्याचा प्रयत्न करणार आहे.

**मनोज पाटील**, कंत्राटदार कंपनी प्रतिनिधी




काँग्रेस ने आज स्वराज्य भवनात महापालिका निवडणुकीसाठी इच्छूक उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. यावेळी मोठ्या संख्येत इच्छूकांची गर्दी होती.

# धाडसत्रात जप्त मिळकतींबाबत दावे दाखल करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला:** जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून ७ फेब्रुवारी २०२४ रोजी अवैध सावकारीसंदर्भात धाडसत्र राबविण्यात आले. विनापरवाना सावकारी करणा-यांविरुद्ध कार्यवाही करताना ताबेगहाण मालमत्ता ताब्यात घेण्यात आली. या मिळकतींबाबत संबंधितांनी दावा दाखल करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या धाडसत्रामधील मनोहर अडितमल कृपलानी, दिनेश मनोहर कृपलानी (रा. पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला) व संतोष श्रीराम अहिर (पायल बंगल्यामागे, संदेशनगर, वाशिम बायपास, ता. जि. अकोला) याठिकाणी कुणा संबंधित व्यक्तींची मालमत्ता कर्जाचे तारण म्हणून त्यास ताबेगहाण ठेवण्यात आली असल्यास संबंधित कर्जदार किंवा त्यांच्या वारसांनी लेखी दावा आवश्यक पुराव्यासह दाखल करावा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, 'सहकार संकूल' आदर्श कॉलनी, अकोला येथे दि. २९ डिसेंबर २०२५रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपावेतो कार्यालयीन दिवशी मालमत्तेची, कागदपत्रांची पाहणी करावी व दि. ३० डिसेंबर २०२५ ते ९ जानेवारी २०२६ या कालावधीत मालमत्तेबाबत दावे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधकांनी केले आहे.

# डॉ. गौरव गोसावी यांचे निधन

**मूर्तिजापूर :** येथील डॉ.गौरव गोसावी यांचे हृदय विकाराच्या धक्क्याने काल रात्री वयाच्या ४०व्या वर्षी निधन झाले.



येथील लक्ष्मीबाई देशमुख उपजिल्हा रुग्णालयात त्यांनी वैद्यकीय अधिकारी म्हणून अनेक वर्षे सेवा दिली असून नुकतेच त्यांचे धोत्रा प्राथमिक आरोग्य केंद्रात स्थानांतरण झाले होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा व मुलगी असा मोठा आप्त परिवार आहे.

# अकोल्यातील पत्रकारांवर झालेल्या कारवाईचा पत्रकारांनी केला निषेध

## उपविभागीय अधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



प्रतिनिधी १८ डिसेंबर

**मूर्तिजापूर :** अकोल्यातील पत्रकारांवर ठोठावलेल्या ५ दिवसांच्या कोठवडीच्या शिक्षेविरोधात मूर्तिजापूर तालुक्यातील पत्रकारांनी काळ्या फिती बांधून, पोलीस बंदोबस्तात सोमवारी तीव्र निषेध आंदोलन केले. विधानपरिषदेतील विशेषाधिकाराचा वापर करत महिला पत्रकार हर्षदा गणेश सोनवणे यांच्यासह अन्य पत्रकारांवर करण्यात आलेली कारवाई ही लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर घाला असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

पत्रकारांनी 'पत्रकारांवरील कारवाई मागे घ्या', 'पत्रकार एकजुटीचा विजय असो', 'पत्रकारांची मुस्कटदाबी थांबावी', 'हम से जो टकरायगा, मिट्टी में मिलाया जायेगा' अशा आक्रमक घोषणांनी परिसर दणाणून सोडला. या आंदोलनाचे निवेदन उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना सादर करण्यात आले.

या निषेध आंदोलनात विलास नसले, प्रा. अविनाश बेलाडकर, प्रा. दिपक जोशी, दिलिप देशमुख, दिपक अग्रवाल, संजय उमक, अनिल अग्रवाल, संतोष माने, प्रतिक कुऱ्हेकर, मिलिंद जामनिक, रोहित सोळंके, शाम वाळसकर, आदित्य महाजन, रवि खिराडे, जयप्रकाश रावत, गौरव अग्रवाल, सुमित सोनवणे, प्रा. एल. डी. सरोदे, योगेश आगासे, नरेंद्र खवले, अंकुश अग्रवाल, प्रेमराज शर्मा, दिपक थोरात, मच्छिंद्र भटकर, अजय प्रभे, प्रकाश वानरे, विलास वानखडे, व ॲड. निलेश सुखसोहळे आदी पत्रकार सहभागी झाले होते.

# शिक्षक मतदार संघाच्या मतदारांची शिक्षण विभागाकडून पडताळणी करून घ्या

प्रतिनिधी १८ डिसेंबर

## भारतीय जनता पक्षाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**अकोला :** अमरावती विभाग शिक्षक मतदार संघामध्ये होऊ घातलेल्या निवडणुकीची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप मतदार यादीवर आक्षेप भारतीय जनता पक्षाच्या वतीने जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना व उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेश परांडेकर यांच्याकडे नोंदविण्यात आले आहेत. यादीची पडताळणी करून घेण्याची मागणी केली आहे.

ज्यामध्ये प्रारूप मतदार यादीतील इंग्रजी माध्यमांच्या शाळेतील शिक्षक पात्र कालावधीपासून अध्यापन करीत आहेत का ? याची तपासणी शिक्षण विभागाकडून यु-डायस प्रणाली मार्फत करून घेण्यात यावी यासह यादीतील ६१ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या व २५ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या शिक्षका मतदारास पात्र आहे अथवा नाही याची पुनर तपासणी करावी, शाळानिहाय नोंदणी केलेल्या



शिक्षकांची संख्या शाळेच्या संचमान्यतेनुसार आहे का ? हे तपासणे, शाळा व्यतिरिक्त इतर विद्यालय महाविद्यालय टायपिंग इन्स्टिट्यूट येथील शिक्षक मतदार होण्यास पात्र कालावधीपासून अध्यापन करीत आहेत का? याची योग्य यंत्रणेद्वारा तपासणी होऊनच मतदार यादी अंतिम व्हावी अशी विनंती जिल्हाधिकारी वर्षा मीना व उपजिल्हा निवडणूक अधिकारी श्री.महेश परांडेकर यांना भारतीय जनता पक्ष अकोला ग्रामीणचे शिक्षक मतदार संघ सह नोंदणी प्रमुख मनीष गावंडे यांनी केली आहे.

# मुदतीत नोंद न झालेल्या पिकांची ऑफलाईन पाहणी

**अकोला:** खरीप हंगाम २०२५ मध्ये विहीत मुदतीत ई- पीक पाहणीची नोंद न झालेल्या शेतक-यांच्या पिकांची ऑफलाईन पाहणी करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जमाबंदी आयुक्त कार्यालयाकडून निर्गमित करण्यात आल्या आहेत. संबंधित शेतकरी बांधवांनी ऑफलाईन पाहणीचे अर्ज २४ डिसेंबरपूर्वी ग्राम महसूल अधिका-यांकडे देण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. याबाबतचा शासन निर्णय १४ डिसेंबर २०२५ रोजी जारी झाला. त्यानुसार जमाबंदी आयुक्त तथा भूमी अभिलेख संचालक डॉ. सुहास दिवसे यांच्याकडून सर्व जिल्ह्यांना या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. ऑफलाईन पाहणीसाठी ग्रामस्तरीय समिती मंडळ अधिका-यांच्या अध्यक्षतेत स्थापण्यात येत असून, ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व सहायक कृषी अधिकारी हे सदस्य आहेत.

## जाहीर नोटिस

प्रो.नं. १७९३/२०२५

दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर दि. ०४/११/२०२५

**वि. २ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

**आर. एम.जे.सी. अर्ज क्र. ३२४/२०२५** **ने.ता. ०२/०१/२०२६**

**अर्जदार:-**

१. **जीवन विठ्ठल खडे,** वय ३८ वर्ष, धंदा- शेती
२. **सुरेश विठ्ठल खडे,** वय ४० वर्ष, धंदा - शेती
अ.क्र. १ व २ रा. रामतीर्थ, ता. दर्यापूर, जि. अमरावती.

**- विरुध्द -**

**गैर-अर्जदार,**

१. **सौ. मीनाक्षी निरंजन खरात,** वय अं. ४६ वर्ष, धंदा- घरकाम रा. बजरंग वाडी, मोठी उमरी अकोला, ता. जि. अकोला.
२. **शिवाजी विठ्ठल खडे,** वय अं. ४२ वर्ष, धंदा- मजुरी रा. बजरंग वाडी, मोठी उमरी अकोला, ता. जि. अकोला.
३. **सौ. ज्योती संगम आठवले,** वय अं. ४० वर्ष, धंदा- घरकाम रा. खरब डोरे, पो. सोनोरी, ता. मुर्तीजापूर, जि. अकोला.

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **विठ्ठल गणपत खडे** हे दिनांक २३/०४/२०२३ रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दि. ०४/११/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर**

## जाहीर नोटिस

प्रो.नं. ४६७२/२०२५

दिवाणी न्यायालय व. स्तर, दर्यापूर दि. १५/१२/२०२५

**वि.सह सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) दर्यापूर जि. अमरावती यांचे न्यायालय**

**किरकोळ अर्ज क्र. ४७५/२०२५** **ने.ता. ०१/०१/२०२६**

**अर्जदार:-**

१. **श्रीमती कमल अण्णा अडबोल,** वय अं. ७५, धंदा- घरकाम रा. बिल्डींग क्र. १६/२५२ कन्नमवार नगर-१, टेनंट असोसिएशन हॉल विक्रोळी (पूर्व) मुंबई, महाराष्ट्र - ४०००८३
२. **सौ. म्रिणाल देवदत्त पवार,** वय अं. ५० वर्ष, धंदा - नोकरी रा. बी/७१२ सी एच एस ग्रीन वाल्लेय कॉम्प्लेक्स केडीएमसी स्पोर्टस कॉम्प्लेक्स जवळ, खांबलपाडा, डोंबिवली (पूर्व) पो. टिळकनगर, ता. कल्याण, जि. ठाणे ४२१२०१
३. **सौ. मृदुला अमित पाटील,** वय अं. ४३ वर्ष, धंदा- घरकाम रा. किनारा बंगला, हॉटेल बि स्प्लाश, शासकीय वसाहती वसाहती अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड

**- विरुध्द -**

**गैर-अर्जदार,**

१. **संजय अण्णा अडबोल,** वय अं. ४३ वर्ष, धंदा- नोकरी रा. फ्लॅट नं. ६०१, ऐ विंग, प्लॉट ई-१४, बेलपाडा खारघर ता. खारघर जि. रायगड

या जाहीर नोटीस व्दारे सर्वांना कळविण्यात येते की, **अण्णा शामराव अडबोल** हे दिनांक २६/०४/२०२३ रोजी मरण पावले आहे.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **भारतीय उत्तराधिकारी कायदा १९२५ चे कलम ३७२ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन: अण्णा शामराव अडबोल** यांचे भारतीय स्टेट बँक शाखा, रामतीर्थ, ता. दर्यापूर, जि. अमरावती येथे बचत खाते क्र. ११६०६१७२२७८ असून त्यामध्ये त्यांची रु. २१२६३/- ठेव जमा आहे. तसेच त्यांनी सदर बँकेत खालील प्रमाणे रक्कम हमी गुंतवणूक केली आहे.

१. दि. २१/०६/२०१६ ला खाते क्र. ३५८५२४३२८१७ रक्कम १,००,०००/-
२. दि. ११/०५/२०१८ ला खाते क्र. ३७६९८२५१३११ रक्कम १,५०,०००/-
३. दि. २१/०५/२०१९ ला खाते क्र. ३८४७०९५६०८१ रक्कम १,५०,०००/-
४. दि. ०१/०६/२०२० ला खाते क्र. ३९३६६५१२३७९ रक्कम रु. १,५०,०००/-

संपूर्ण हमी गुंतवणूक मिळून एकूण रक्कम रुपये ५,५०,०००/-

आज दि. १५/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहा. अधिक्षक (प्रशासन)**
**दिवाणी न्यायालय व. स्तर दर्यापूर**

# शेतात पाणी देताना हृदयविकाराचा झटका; आलेगाव येथील शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी १८ डिसेंबर



**आलेगाव :** पातूर तालुक्यातील आलेगाव येथील शेतकरी शेतात पाणी देण्याच्या कामात असताना त्यांचा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना आलेगाव शिवारात घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावात शोककळा पसरली आहे. आलेगाव येथील शेतकरी मुब्बशीर खान रुमखान ५५ ) हे नेहमीप्रमाणे रात्रीच्या सुमारास आपल्या शेतात पिकांना पाणी देण्यासाठी गेले होते. पाणी देण्याचे काम सुरू असतानाच त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. छातीत तीव्र वेदना जाणवल्याने त्यांनी आपल्या मुलाला आवाज देत प्रकृती बिघडल्याची माहिती दिली. तत्काळ कुटुंबीयांनी त्यांना वाहनातून उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक माहितीनुसार मृत्यूचे कारण हृदयविकाराचा तीव्र झटका असल्याचे सांगण्यात आले आहे. मुब्बशीर खान यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. कुटुंबाचा मुख्य आधार असलेला कर्ता पुरुष अचानक काळाच्या पडद्याआड गेल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# हिवरखेड पोलिसांची अवैध गोमांस विरुद्ध कारवाई




**हिवरखेड:** गावातील प्रभाग १ मधील इंदिरा नगर मध्ये गोपनीय माहिती वरून पोलिसांनी धाड टाकली असता त्यांना अवैध गोमांस आढळले. ८५ किलो गोमासासह एक कुऱ्हाड २ चाकू १ टोचा काठी, असा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई हिवरखेड ठाणेदार गजानन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद खर्डे, प्रमोद चव्हाण, आकाश गजभार, माऊली विठ्ठल उरकडे, महिला पोलीस कर्मचारी रेणुका पाबळे, यांनी केली, आरोपी विरुद्ध कलम २५, बी एन एस सहकलम ५,(अ) १(अ) महाराष्ट्र पशु अधिनियम नुसार गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास हिवरखेड पोलिस करीत आहेत.

# निबंध, चित्रकला स्पर्धेचे पुरस्कार वितरण

प्रतिनिधी १८ डिसेंबर




**मूर्तिजापूर :** पोलीस दल विद्यार्थ्यांमध्ये कलागुण व सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी निबंध आणि चित्रकला स्पर्धा आयोजित करते. ज्यात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देऊन त्यांना देशभक्ती व समाजसेवेसाठी प्रेरणा देण्याचा प्रयत्न केला जातो, असे उद्गार अकोला जिल्हा पोलीस अर्चित चांडक मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन येथे आयोजित 'राज्य गणेशमहोत्सव' निबंध व चित्रकला स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी बोलत होते.

राज्य गणेशमहोत्सवठ अंतर्गत अकोला जिल्हा पोलीस दलाच्या तर्फे मूर्तिजापूर शहर पोलीस स्टेशन च्या वतीने शहरातील भारतीय ज्ञानपीठ विद्यालय येथे चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेतील गुणवंत विद्यार्थ्यांना अकोला जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेत शहरातील ९ ते १० शाळांचा सहभाग होता, तर ५ वी ते ८ आणि ९ वी १२ वी या दोन गटात निबंध आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

या मध्ये सर्व गटातील विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी शहर पोलीस प्रशासनाच्या वतीने पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देऊन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती वैशाली मुळे व ठाणेदार अजित जाधव यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

तर स्पर्धेचे उत्कृष्ट नियोजन केल्या बद्दल जेष्ठ पत्रकार प्रा. अविनाश बेलाडकर, प्रा.दिपक जोशी, प्रतिक कुऱ्हेकर, शाम वाळसकर यांना सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त झालेल्या भारतीय ज्ञानपीठ विद्यालय, इंटरनॅशनल स्कूल ऑफ इंटिग्रेटिव्ह एज्युकेशन, सेंट अँन्स स्कुल, श्री व्यंकटेश बालाजी हायस्कूल, अकॅडमीक हाईट्स पब्लिक स्कूल, मुर्तीजापुर हायस्कूल मुर्तीजापुर, परमानंद मालानी, मुर्तीजापुर पब्लिक स्कूल, गाडगे महाराज विद्यालय, सेंट झिवियार्स स्कुल, सरला राम काकानी आदी शाळेच्या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616

बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५


### गोळीबारात एक आरोपी जखमी

■ महागाव तालुक्यातील वाकोडी वाडी येथे सहा रेती तस्करांनी पोलीस उपनिरीक्षकांवर हल्ला केला. या मध्ये बचावासाठी पोलीस उपनिरीक्षकांनी गोळीबार केला. या गोळीबारात गुलाब खाजा शेख हा जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. पोलिसांनी तीन आरोपींना ताब्यात घेतले आहे. तर उर्वरीत तीन आरोपीचा कसुन शोध सुरु आहे. या घटनेने परिसरात चांगलीच बळबळ उडाली आहे.

### एसपीची घटनास्थळी भेट

■ रेती तस्करांनी पोलीस अधिका-यांवर झालेला या हल्ल्यातून रेती तस्कर पोलिसांवर हेवी झाल्याचे दिसून येत आहे. या गंभीर घटनेची दखल घेत जिल्हा पोलीस अधिक्षक कुमार चिंता हे घटनास्थळी भेट दिली आहे. त्यांनी घटनास्थळाची भेद देवून पाहणी केली. या घटने संदर्भातील माहिती जाणुन घेतली आहे.

# रेती तस्करांचा एपिआयवर प्राणघातक हल्ला

## बचावासाठी पोलीस अधिकाऱ्याने केला गोळीबार : एक आरोपी जखमी; परिसरात तणाव






प्रतिनिधी १८ डिसेंबर

यवतमाळ जिल्ह्यात रेती तस्करांची दहशत दिवसेंदिवस वाढत असून आज महागाव तालुक्यातील वाकोडी वाडी (मोरथजवळ) येथे रेती तस्करांनी थेट पोलिस अधिकाऱ्यावर हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. या हल्ल्यात महागाव येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) सुनील अंबोरे हे जखमी झाले असून, स्वतःचा जीव वाचवण्यासाठी त्यांनी हवेत गोळीबार केला. ही घटना आज सकाळी सुमारे १० वाजताच्या सुमारास घडली.

अवैध रेती वाहतुकीवर कारवाईसाठी गेलेल्या पोलिस पथकावर पाच रेती तस्करांनी दगड व लाठ्याकाठ्यांनी हल्ला चढवला. या हाणामारीत API सुनील अंबोरे यांना दुखापत झाली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच आंबोरे यांनी प्रतिउत्तर म्हणून हवेत दोन राऊंड फायर केले. एकूण सहा राऊंड फायरिंग झाल्याची माहिती असून, यात एक आरोपी जखमी झाल्याचे समजते. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्य राखीव पोलीस दल (SRPF), दंगल नियंत्रण पथक व अतिरिक्त पोलीस कुमक तातडीने घटनास्थळी दाखल झाली आहे.

पुसद येथील उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन डीजे तसेच यवतमाळचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. या घटनेमुळे जिल्ह्यातील अवैध रेती तस्करी व त्यामागील राजकीय पाठबळाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

जिल्ह्यात रेती तस्कारांचा धुमाकुळ काही नवीन नाही. जिल्ह्यातील अनेक नदीच्या पात्रातून ट्रेझर बोडने रेतीची तस्करी सुरु केली आहे. राजकीय पाठबळ असल्याने रेती तस्करांची दादागिरी सुरु असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

आज रेती तस्करांनी आपली हद्द ओलांडली असून, चक्क पोलीस अधिका-यांना मारहाण करुन हल्ला चढविला आहे. तर पोलीस अधिका-याने आपला जिव वाचविण्यासाठी थेट हवेत गोळीबार केला आहे.

# थर्माकोल बोटींमधून रेती तस्करी?

## लाखो रुपयांचा काळा धंदा; प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील कारखेड गावात पैनगंगा नदीपात्रातून थर्माकोल बोटींमधून रेतीची अवैध वाहतूक व तस्करी होत असल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. शासनाकडून अद्याप रेती लिलाव झालेला नसतानाही विकासकामांवर मोठ्या प्रमाणावर रेतीचा वापर कसा होत आहे, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.

कारखेड येथे पैनगंगा नदीवर कोल्हापुरी बंधाऱ्याचे काम सुरू असून, त्यातून निघणारे दगड, मुरूम, गोटा तसेच रेती थर्माकोल बोटीद्वारे काढली जात असल्याचा आरोप आहे. ही रेती शासकीय व ग्रामीण भागातील विकासकामांवर सर्रास वापरली जात असून, गौण खनिजांच्या माध्यमातून लाखो रुपयांची तस्करी करून महसूल



विभागाला मोठा फटका दिला जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

गावात बसविण्यात आलेले ग्रामपंचायतीचे सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याने अवैध धंद्यांना मोकळे रान मिळत असल्याचा आरोप होत आहे. हे कॅमेरे नेमके कोणी व कशासाठी बंद ठेवले, असा प्रश्नही ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. 'डमी ठेकेदारां'च्या माध्यमातून विकासकामे सुरू असून त्यावर अवैध रेतीचा वापर होत असल्याचा आरोप आहे.

या प्रकारामुळे गावातील युवक वर्ग काळ्या धंद्याकडे वळत असून त्यांचे भविष्य धोक्यात येत असल्याची चिंता सामाजिक बांधिलकी जपणारे नागरिक व पर्यावरणप्रेमी समाजसेवक व्यक्त करीत आहेत. या अवैध कृत्यांविरोधात प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

दरम्यान, या प्रकारांची दखल न घेतल्यास येत्या २६ जानेवारी रोजी जनसामान्य व युवक वर्गाच्या वतीने प्रशासनाविरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे प्रधानमंत्री आवास (घरकुल) योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात निधी जमा होऊनही रेती उपलब्ध होत नसल्याने घरकुलांची कामे रखडली आहेत. याप्रकरणी सखोल चौकशी करून मार्च अखेरपूर्वी लाभार्थ्यांना सहकार्य करून घरकुलांचा लाभ द्यावा, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे. कारखेडमधील कथित रेती तस्करी प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष घालून दोषींवर कारवाई करावी व सर्वसामान्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# अनुदानित वसतिगृह कर्मचाऱ्यांचे १,२०० कोटी वेतन थकित

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**यवतमाळ :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनुदानावर चालणाऱ्या राज्यातील २,३८८ वसतिगृहांमध्ये कार्यरत ८,१०४ कर्मचारी गेली दोन दशके अपूर्ण वेतनावर काम करत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. शासन निर्णय दिनांक १६ मार्च १९९८ नुसार शासन व संबंधित संस्थांकडून समान वाट्याने पूर्ण वेतन देणे बंधनकारक असतानाही, २००५ नंतर अनेक संस्थांनी आपला ५० टक्के हिस्सा देणे थांबविल्याने कर्मचाऱ्यांचे सुमारे १,२०० कोटी रुपयांचे वेतन थकीत राहिले आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य अनुदानित वसतिगृह कर्मचारी संघटनेने दिली.

गेल्या दहा वर्षांत निवेदने, मोर्चे, उपोषणे करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने कर्मचाऱ्यांचे आर्थिक संकट तीव्र झाले आहे. अनेक कर्मचाऱ्यांनी विवंचनेत जीव गमावल्याचे सांगण्यात येत असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांचे शिक्षण व पालकांची जबाबदारी सांभाळणे कठीण झाले आहे. समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांनी जिल्हा समाजकल्याण अधिकाऱ्यांना वारंवार सूचना देऊनही संस्थांवर ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार संघटनेने केली आहे.

२००४ पर्यंत शासन व संस्था दोन्हींकडून वेतनाची पूर्ण रक्कम दिली जात होती. मात्र वेतनवाढीच्या शासन आदेशानंतर अनेक संस्थांनी आपली आर्थिक जबाबदारी झटकल्याचा आरोप करण्यात आला आहे. संघटनेचे कार्याध्यक्ष प्रदीप वाक्पैजन यांनी गेल्या दशकभरात सातत्याने हा मुद्दा आंदोलनातून मांडला आहे. त्यांच्या उपोषणानंतर २२ सप्टेंबर २०२५ रोजी समाज कल्याण आयुक्तालयात झालेल्या दोन बैठकीत किमान वेतनाचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठविण्याचे व थकीत वेतनासह सेवाशर्तींबाबत निर्णय घेण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नसल्याचे वाक्पैजन यांनी सांगितले.

सेवाशर्तींच्या बाबतीत या कर्मचाऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. निवृत्तीनंतर पेन्शन, सेवा शाश्वती, रजा, भत्ते व भविष्य निर्वाह निधी यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. समान काम समान वेतनाचा नियम असूनही अधीक्षकांना १० हजार, स्वयंपाक्यांना ८ हजार ५०० तर मदतनीस व चौकीदारांना केवळ ७ हजार ५०० रुपये मानधन मिळत आहे.

या अन्यायाविरुद्ध संघटनेचे पदाधिकारी प्रदीप वाक्पैजन, मारुती कांबळे, अशोक ठाकर, दत्ता पाटील, पंकज गायकवाड, जयेंद्र देशपांडे,

# स्वामी नामाने दुमदुमली ढाणकी नगरी

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**ढाणकी :** ढाणकी येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचा द्वितीय वर्धापन दिन शहरात भक्तीभाव व उत्साहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

यानिमित्त गुरू आई जया महादेव शंकर (पाचोरा धाम, जळगाव) यांच्या पावन उपस्थितीत श्री स्वामी समर्थ महाराजांच्या भव्य पादुका पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील प्रमुख मिरवणूक मार्गाने निघालेल्या या पालखी सोहळ्यात सर्व स्तरांतील भाविक व सेवेकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. स्वामी नामाच्या गजराने संपूर्ण ढाणकी नगरी दुमदुमून गेली. पालखी सोहळा अखेरीस श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात संपन्न झाला.

या सोहळ्यात आराध्य चव्हाण या चिमुकल्याने गुरू आई जया महादेव शंकर यांच्या सोबत महादेवाची भूमिका साकारून सर्वांचे लक्ष वेधले. तसेच समर्थ रावते व प्रियांश चोरे यांनी श्री स्वामी समर्थ महाजनांच्या भूमिकेतून भाविकांची मने जिंकली, तर शुभ्रा रावते हिने सुंदराबाईची भूमिका साकारली. पालखी सोहळ्याचे शिस्तबद्ध नियोजन केंद्र निरीक्षक पूनमताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली निकिता रावते, योगिता चिन्नावार व समस्त



सेवेकऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडले. पालखी सोहळ्यानंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते.

# जी.एन. आझाद उर्दू अध्यापक विद्यालयात जीएनएसएल स्पर्धा

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**पुसद :** पुसद येथील नामवंत शिक्षण संस्था जी.एन. आझाद उर्दू अध्यापक विद्यालयात भव्य जीएनएसएल खेळ स्पर्धेचा शुभारंभ प्राचार्य ख़ान हसनैन आक़िब यांच्या हस्ते बॅडमिंटन सामन्याच्या पहिल्या सर्विसने झाला.



आठवडाभर चालणाऱ्या या स्पर्धेत विविध खेळांचे आयोजन करण्यात आले आहे, ज्यामध्ये क्रिकेट, लगोरी, बॅडमिंटन, रस्सीखेच, टेनीक्विट, लेमन-स्पून आणि संगीत खुर्ची यांचा समावेश आहे.

स्पर्धेचे समन्वयक प्रा. इबान अहमद व प्रा. ताबिश अली, तर आयोजन सहाय्यक म्हणून क्लास कॅप्टन नाजनीन तबस्सुम व मारिया खानम असून, द्वितीय वर्षाचे छात्राध्यापक मुशफ़िक़ अली, शहज़ाद खान, शेख़ मुन्तजिर, आणि प्रथम वर्षाचे जूनेद ख़ान व ज़ैद अली सहभागी आहेत.

स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थी व छात्राध्यापिकांमध्ये द्वितीय वर्षातून सबा फातेमा, सदफ आफरीन, सानिया परवीन, शीफा परवीन इत्यादींचा समावेश असून, प्रथम वर्षातून नाज़नीन तबस्सुम, अलवीरा ऐमन, कनीज फातिमा, आयशा शिफ़ा व इतर विद्यार्थी सहभागी आहेत. उद्घाटनानंतर लगेचच बॅडमिंटन सामने सुरू झाले आणि स्पर्धेमुळे विद्यालयात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

पुढील आठवड्यात क्रिकेट, रस्सीखेच, संगीत खुर्ची, टेनिकविट, लेमन-स्पून आणि इतर रोचक खेळांचे सामने रंगणार आहेत, ज्यात सर्व छात्राध्यापक व विद्यार्थी सक्रिय सहभाग घेणार आहेत.

# यवतमाळ न.प.निवडणूक; १२०० मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**यवतमाळ :** यवतमाळ नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे. २० डिसेंबर रोजी होणाऱ्या मतदानासाठी शहरात एकूण २४८ मतदान केंद्रे उभारली जाणार आहेत. या प्रक्रियेसाठी तब्बल १२०० मतदान कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.




१७ डिसेंबर रोजी शासकीय नाट्यगृह, गार्डन रोड येथे मतदान केंद्राध्यक्ष आणि कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी गोपाळ देशपांडे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी योगेश देशमुख, शुभम केतन वार आणि नायब तहसीलदार एकनाथ बिजवे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रशिक्षणात ईव्हीएम यंत्राची जोडणी, प्रत्यक्ष हाताळणी, मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडणे आणि विविध अहवाल भरण्याबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली.

मतदान पथके १९ डिसेंबर रोजी शासकीय तंत्रनिकेतन, धामणगाव रोड येथून केंद्रांवर रवाना होणार आहेत. यासाठी २१ मोठ्या बस आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी २९ जीप-क्रूजर वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी टपाली मतदानाची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. हे मतदान १८ आणि १९ डिसेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी ५ या वेळेत शासकीय तंत्रनिकेतन येथे होईल. प्रशासनाच्या या तयारीमुळे मतदान शांततेत आणि पारदर्शीपणे पार पडेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# वनिष घोसले यांना सरपंच पदावरुन काढण्याचा आयुक्तांचा आदेश

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**यवतमाळ :** पळसकुंड उमरविहीर ग्रामपंचायतचे सरपंच वनिष घोसले यांना दिनांक 12 डिसेंबर 2025 रोजी सरपंच पदावरून काढण्याचा आदेश अपर आयुक्त, अमरावती यांनी पारित केल्याने गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

सुभाष शिंदे उपसरपंच, यांनी भ्रष्टाचार व गैरवर्तन बाबत ग्रामपंचायत अधिनियम, 1959 च्या अंतर्गत आयुक्त यांच्या कडे अर्ज सादर केला होता. त्या नंतर अर्जावर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्याकडून चौकशी करण्यात आली. सदर चौकशी मध्ये बोगस ग्रामसभा व बेकायदेशीर ठराव पास केल्याचे निष्पन्न झाले. या चौकशी दरम्यान सरपंच वनिष घोसले यांनी भ्रष्टाचार व गैरव्यवहार केल्याचे समोर आले.

या चौकशी अहवाल नंतर अपर आयुक्त अमरावती यांच्या पुढे सुनावणी व युक्तिवाद झाल्या नंतर प्रकरण आदेशसाठी ठेवण्यात आले. सदर प्रकरणात सरपंचाने जवळपास अठरा ते वीस लाख रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे. पळसकुंड ग्रामपंचायत ही पेसा ग्रामपंचायत असल्याने प्रचंड निधीचा ओघ आहे. म्हणूनच गरीब व अशिक्षीत आदिवासी बांधवांची पिळवणूक केल्याच्या अनेक तक्रारी सुद्धा वनिष घोसले यांच्या विरोधात आहे.

सरपंचाने आपले काळे कारनामे लपविण्यासाठी भाजप मध्ये सुद्धा प्रवेश घेतला आहे. आज रोजी या सरपंचाची राळेगाव तालुक्यात गरीब गावचा श्रीमंत म्हणून असलेली प्रतिमा अनेकांना प्रभावित करत असल्याने पक्षात सुद्धा मान सन्मान मिळत आहे.

अपर आयुक्त अमरावती यांनी दिलेल्या आदेशामुळे गावक-यांमध्ये आनंदाचे वातावरण असून भ्रष्टाचारी सरपंच याला पदावरून दूर केल्याने निर्णयाचे स्वागत केले जात आहे. अर्जदार यांच्या वतीने ॲड वैभव पंडित , ॲड मंगेश शेंडे, ॲड निखिल लोंढे यांनी बाजू मांडली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि.१८ डिसेंबर २०२५

निमंत्रण आंदोलन

वाशीम शहरातील रस्ते रातोरात, हातोहात...

# बावनकुळे साहेब या हो, शहरातील रस्ते करा हो !

## पाटणी चौक मार्गाने जावून महाराजांना हार अर्पण करा हो

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

विकासाच्या नावावर हजारो कोटीचे कामे करूनही शहर भकास झाले आहे. नागरिकांना मुलभूत समस्यांनाही सामोरे जावे लागत आहे. शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड घ्यावे लागत आहेत. शिवाय शहरातील रस्तेही १२ वर्षात ५ वेळा होवूनही रस्तेच नव्हे तर नागरिकांचे जीवनच खड्ड्यात गेले आहे. मुख्यमंत्री प्रचारासाठी आले असतांना शहरातील रस्ते तातपूर्ते का होईना रातोरात हातोहात दुरूस्त झाले. त्यामुळे मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो आमआदमी पार्टीचे उमेदवार सागर कोकास यांनी आंदोलन करून केला होते. या संबंधिचे सर्वप्रथम मुख्यमंत्री साहेब, तुमच्या मुळे तातपुरर्ते रस्ते दुरूस्त असे वृत्त लावून सिटी न्युज सुपरफास्टने सर्वप्रथम लक्ष वेधले. सागर कोकासच्या आंदोलनाला यश आले असून सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्ताची दखल घेत मुख्यमंत्री गेल्यानंतरही शहरातील मुख्यमार्गाचे काम सुरू झाले होते. अधिवेशनात जावून सर्वांना निमंत्रण दिले. महसुल मंत्री आता बावनकुळे साहेब वाशीमला येवून पाटणी चौक मार्गाने जा अन् छत्रपती शिवाजी महाराजांना हार अर्पण करा असा अर्त टाहो सागर कोकास यांनी केला आहे.







दि २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून, प्रशासनाने नियोजित मार्गावरील खड्डे तासाभरात बुजविले, जागोजागी स्वच्छता केली, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गेल्या कित्येक महिन्यांपासून असलेली समस्या १० मिनीटांत मार्गी लावली, ह्या सर्व बाबी पाहून आम आदमी पार्टीचे वाशिम नगर परिषद नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास हे व्यथित झाले. त्यामुळे सागर कोकास यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे पोस्टर हाती घेऊन, वाशिम करांना होणाऱ्या त्रासाची बाब अधोरेखीत केली. शहराच्या रस्त्याविषयी फक्त सिटी न्युज सुपरफास्टने शेकडो वृत्ताची वृत्त मालिका चालविली. मुख्यमंत्री येणार त्या दिवशीच मुख्यमंत्री साहेब तातपूर्ती का होईना रस्ते दुरूस्त, प्रशासन सुस्त, नागरिक त्रस्त या आशयाचे वृत्त प्रकाशित केले होते. आणि विविध समस्यांची जाणीव करून दिली. त्यानंतर सागर कोकास यांनी रस्त्यावर उतरून अभिनोव आंदोलन केले. मुख्यमंत्री साहेब रोजच या हो वाशीम शहराचा विकास करा हो असा आर्त टाहो काढला. त्यामुळे आता निवडणुकीच्या तोंडावर दिखावा म्हणून वाशीम शहरातील कामे तातपुरर्ते का होईना सुरू झाले आहेत. पुसद नाका चौकातील काम, राजेंद्र प्रसाद शाळेमागील काम, बाकलीवाल शाळेसमोरील काम, अशा अनेक रस्त्याचे काम सागर कोकास यांच्या आंदोलनामुळे सुरू झाल्याची चर्चा आहे. मात्र पुन्हा शहरातील सर्वच रस्ते दुरूस्त करण्यासाठी मुख्यमंत्र्यांना निमंत्रण देवून पुन्हा खड्ड्याच्या रस्त्यावर या तुम्हच्या मुळे का होईना रस्ते दुरूस्त होतील असे सागर कोकास यांनी आंदोलन केले. वाशिम नगर परिषद निवडणुकीच्या तोंडावर वाशिम शहराचा विकास प्रत्येक राजकीय पक्षांकडून केल्या जातो. मात्र, शहरात रस्त्यावर पडलेले खड्डे, सांडपाण्याचे व्यवस्थापन, पिण्याचे पाणी, टेंपल गार्डनची झालेली दुरावस्था, रखडलेले नाट्यगृह, बंद असलेले पथदिवे, मुख्य शहरात रस्ता नाही, पण जिथे घर नाही अशा भागात सिमेंटचे रस्ते अशा एक नाही, अनेक समस्या वाशिम शहरात आ वासून उभ्या आहेत. २८ नोव्हेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे वाशिम शहरात आले होते. त्यांनी शहर विकासाची आश्वासने दिली. मात्र, वाशिमकर नागरिक दररोज कुठल्या परिस्थितीत जीवन जगतोय, याची त्यांना कल्पनाच नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीचे वाशिम नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकस यांनी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन करणारे पोस्टर दाखविले. कारण, गेल्या कित्येक वर्षापासून रस्त्यावरील खड्डे जसेच्या तसेच आहेत, पिण्याचे पाणी वेळेवर मिळत नाही, जागोजागी कचऱ्याचे ढिग साचले, बंद अवस्थेत असलेले पथदिवे आदि समस्यांचा वाशिमकर दररोज सामना करीत आहेत. मात्र, मुख्यमंत्री शहरात येणार असल्यामुळे प्रशासनाने अगदी तासाभरात रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता तयार केला. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय रोज शहरात आले तर, वाशिमकरांना चांगल्या सुविधा तरी मिळतील, या अपेक्षेपोटी 'मुख्यमंत्री साहेब तुम्ही दररोज वाशिम ला या' असे आवाहन केले.

सागर कोकास यांच्या या आवाहनाच्या शहरातील प्रत्येक मतदाराच्या तोंडी चर्चा सुरू होती. त्यानंतर शहरातील रखडलेल्या कामाला सुरूवात झाली आहे . विविध शहराच्या समस्यांसाठी सागर कोकास हे रस्त्यावर उतरूण नागरिकांना भेट देवून नागरिकांना भेट देवून समस्या सोडविण्याचा प्रयत्न करीत आहेत.उद्या महसुल मंत्री चंद्रकांत बावनकुळे प्रचारासाठी वाशीमला येत आहेत. त्यांनी पाटणी चौक मार्गातून जावून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला हार अर्पण करावा व शहरातील झालेल्या रस्त्याची दुर्दशा पाहावी शहर फिरूण भकास वाशीम शहराचा आढावा घेवून विकास करावा अशी मागणी सागर कोकास यांनी केली आहे.

### समस्यांच्या गर्तेत जीवन जगताहेत वाशिमकर

२८ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री शहरात येणार म्हणून रस्त्यांची स्वच्छता झाली, रस्त्यावरील खड्डे बुजविले. मात्र, गेल्या कित्येक वर्षांपासून वाशिम शहारातील प्रत्येक नागरिक दररोज याच खड्डयांतून ये-जा करतोय, त्यांची हाडे दररोज खिळखिळी होताहेत. त्यामुळे मुख्यमंत्री महोदय दररोज वाशिम ला आल्यास किमान येथील जनतेला चांगल्या सुविधा तरी मिळतील, अशी माफक अपेक्षा आपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सागर कोकास यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर तातपूर्ते का होईना आता निवडणुकीसाठी दिखावा म्हणून मुख्यरस्त्यावरील कामांना सुरूवात झाली आहे. मात्र, सागर कोकास यांच्या आंदोलनामुळेच हे कामे होत असल्याची चर्चा वाशीम शहराच्या मतदारामध्ये आहे.

### 'सिटी न्युज सुपरफास्ट' चा सततचा पाठपुरावा...

सर्व सामान्यांच्या समस्यांसाठी सांध्य दैनिक सिटी न्युज सुपरफास्ट शासन दखल घेईपर्यंत सततचा पाठपुरावा करीत असते. त्यामुळेच १३ वर्षात लोकांच्या मनामनातून घराघरात सिटी न्युज सुपरफास्ट पोहोचला आहे. शहरातील विविध समस्यांच्या प्रत्येक विषयांच्या हजारो वृत्त मालिकेची श्रृंखला सिटी न्युज सुपरफास्टने लावून धरली आहे. शहरातील समस्यांसाठी सदैव प्रथम पुढाकार घेवून समस्या मार्गी लागेपर्यंत शेकडो वृत्तातून वृत्त मालिकेच्या माध्यमातून सततचा पाठपुरावा करीत असल्याने सिटी न्युज सुपरफास्टने जनसामान्यांच्या मनात घराघरात स्थान निर्माण केले आहे. त्याचाच परिणाम म्हणून समस्यांच्या वृत्तांच्या कात्रनाचे बॅनर शहरात आंदोलनाच्या वेळी लागत असतात.




## थोडक्यात

### समृद्धी महामार्गावर अपघात एक ठार, तीन गंभीर जखमी

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

१७ डिसेंबर रोजी सकाळी ४:१०मिनिटांच्या सुमारास एम.एच.०३ के.४९१६ क्रमांकाची गाडी मुंबईवरून उत्तर प्रदेश कडे जात असताना चैनल क्रमांक १६८ जवळ हा अपघात झाला.या अपघातामध्ये घटनास्थळीच एक ठार झाला तर तीन गंभीर जखमी झाले. मृतकाचे नाव मोहम्मद असलम खान वय ४० वर्ष, जखमी रुग्णाचे नाव मोहम्मद मुस्लिम वय ४० वर्ष,फातिमा मोहम्मद वय ५२ वर्ष, कंमरू निसा शेख वय ५५ वर्ष सर्व राहणार नालासोपारा मुंबई अपघाताची झाल्याची माहिती श्री.गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रुग्णसेवक रमेश देशमुख यांनी टोल प्लाजा समृद्धी महामार्ग कारंजा १०८ रुग्णवाहिका पायलट सोनू शिंदे व डॉक्टर गणेश यांना दिली.शिवनी रुग्णवाहिका १०८ पायलट प्रतीक चाकट हे तात्काळ घटनास्थळी जाहून गंभीर जखमी झालेल्या रुग्णाला उपजिल्हा रुग्णालय कारंजा येथे दाखल केले.कारंजा उपजिल्हा रुग्णालय येथे प्रथम उपचार करून पुढील उपचारासाठी अमरावती येथे रेफर केले.त्यावेळी मदतीसाठी समृद्धी रुग्णवाहिकेचे अजय घोडेस्वार व शिवनेरी रुग्णवाहिकेचे विनोद खोंड,श्याम घोडेस्वार कक्ष सेवक सेवक विजय सिरसाठ, शिवम खोड,अग्निशामक समृद्धी महामार्ग कारंजा व हायवे पोलीस प्रामुख्याने घटनास्थळी हजर होते.

### नागरिक सुविधांना प्राधान्य द्या -जिल्हाधिकारी

**वाशीम :** नगरप्रशासन हे थेट नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित आहे. त्यामुळे नगरपरिषद व नगरपंचायत स्तरावरील प्रत्येक काम गुणवत्तापूर्ण, वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने पूर्ण झाले पाहिजे. स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते व इतर मूलभूत नागरी सुविधा या बाबींमध्ये कोणतीही तडजोड न करता नागरिकांना दर्जेदार सेवा देणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. प्रलंबित विकासकामांना तातडीने गती देऊन करसंकलन, ई-गव्हर्नन्स व तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावीपणे राबवावी,नागरिक सुविधांना प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

### मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या ; अपघाताला आमंत्रण

• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

मंगरूळपीर शहरात मोठ्या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे.

जनावरांचा बंदोबस्त करण्यासाठी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसाठी कोंडवाड्याची सुविधा करावी. मंगरुळपीर शहरात ठिकठिकाणी मोकाट गुरांचा ठिय्या असून मोकाट गुरे भर रस्त्यावर बसने,रस्त्यावर वावरणे इत्यादी कारणां मुळे वाहतुकीस अडथळा येत असून किरकोळ अपघात घडत आहेत तसेच शहरात घाण होत आहे. शहरातील अकोला चौक, शेलुबाजार रोड, इत्यादी भागात मोकाट गुरांचा वावर वाढला आहे.


## आदिवासीबहुल गावांतील मूलभूत सुविधांचा सखोल आढावा

### समस्या समजून तात्काळ निराकरणावर भर द्यावा -डॉ.श्वेता सिंघल

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

आदिवासी बहुल गावांतील नागरिकांना मूलभूत सुविधा सहज, नियमित व दर्जेदार स्वरूपात उपलब्ध होणे ही शासनाची सर्वोच्च जबाबदारी आहे. पाणीपुरवठा, रस्ते व शेतरस्ते, वीज, शिक्षण, आरोग्य सेवा, वैद्यकीय सुविधा, बँकिंग व सेवा केंद्र यासारख्या आवश्यक बाबींची प्रत्यक्ष क्षेत्रात पाहणी करून त्यातील उणिवा तात्काळ दूर करणे आवश्यक आहे. आदिसेतू जनसंवाद उपक्रमांतर्गत आयोजित क्षेत्रभेटींचा उद्देश केवळ पाहणीपुरता मर्यादित नसून, गावकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घेऊन त्यावर कालबद्ध व परिणामकारक उपाययोजना राबविणे हा आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून आदिवासी बहुल गावांचा सर्वांगीण विकास साधत प्रशासन अधिक लोकाभिमुख, संवेदनशील व



उत्तरदायी बनविण्याचा आमचा संकल्प आहे, असे प्रतिपादन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी केले. आदिसेतू जनसंवाद उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या क्षेत्रभेट उपक्रमाचा सविस्तर आढावा विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. आदिसेतू जनसंवाद उपक्रमांतर्गत आयोजित क्षेत्रभेटींचा उद्देश केवळ पाहणीपुरता मर्यादित नसून, गावकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष समजून घेऊन त्यावर कालबद्ध व परिणामकारक उपाययोजना राबविणे हा आहे. नियुक्त अधिकाऱ्यांनी जबाबदारीने गावभेटी देऊन शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्र, पाणीपुरवठा व्यवस्था व इतर विभागांच्या सेवांची सखोल तपासणी करावी. यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, सहाय्यक परिविक्षाधीन अधिकारी आकाश वर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान, उपवनसंरक्षक अभिजीत वायकोस, अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांच्यासह विविध यंत्रणा प्रमुख उपस्थित होते. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन व नागरिकांमधील थेट संवाद अधिक प्रभावी करून शासनाच्या विविध योजना, सेवा व उपक्रम प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे.

## माणूसकीचे धनी - गोविंद वर्मा

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

राष्ट्रवादी काँग्रेसपक्षाचे अजितदादा पवार गटाचे निष्ठावान कार्यकर्ते तथा वाशीम शहर अध्यक्ष गोविंद वर्मा यांची वाशीम जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रात माणूसकीचे धनी म्हणून ख्याती आहे.

गोविंद वर्मा व्यवसायाने सराफ असल्याने त्यांनी व्यापारी बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी सुरूवातीपासून पुढाकार घेतला आहे. राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा ना अजितदादा पवार यांच्या कणखर नेतृत्वाची छाप गोविंद वर्मा यांच्यावर पडलेली आहे.वाशीम शहरातीलच नव्हे तर जिल्ह्यातील सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे पक्षाच्या माध्यमातून अविरत कार्य सुरू आहे. वाशीम माध्यमातून अविरत कार्य सुरू



आहे वाशीम जिल्ह्यातील सराफा व्यापाऱ्यांच्या समस्या सोडवून त्यांना न्याय देण्यासाठी त्यांचे कौतुकास्पद कार्य आहे. सुस्वभावी असलेले गोविंद वर्मा यांचा सामाजिक कार्यातही अग्रेसर असतात त्यांनी मागील २० वर्षापासून समाजसेवेचा ध्यास घेतला असून सर्वसामान्य नागरिक आणि व्यापारी बांधवांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी वेळेप्रसंगी त्यांनी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा केल्याचे अनेक उदाहरणे आहेत. उल्लेखनिय म्हणजे गोविंद वर्मा यांनी वाशीम शहरातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नासाठी विविध आंदोलने करून सर्वसामान्यांना न्याय दिल्याचेही अनेक उदाहरणे आहेत. साधी राहणी व उच्च विचारसरणी असलेल्या गोविंद वर्मा यांनी समाजसेवेचा ध्यास घेतला असून त्या दष्टीने त्यांची कामगिरी कौतुकास्पद आहे.

### प्रशासन 'कोमात' तर तस्कर 'जोमात'

## मानोरा तालुक्यात वृक्षांची कत्तल

• सिटी न्युज ब्युरो @ मानोरा •

तालुक्यातील सह अनेक गावातील आडजात झाडे वनतस्कर शेतकऱ्यांच्या धुर्यावरील विकत घेऊन विना परवानगी हिरवी कच्च झाडाची राजरोस पणे कत्तली सुरू असून याकडे वन विभागाचे अधिकारी वनपाल व वनरक्षक चिरीमिरी घेऊन याकडे दुर्लक्ष करतात.

एकी कडे शासन वृक्षारोपण करीत असताना मानोरा परिसरात दररोज शेकडो वृक्षांची कत्तल होत असून दिवसा वृक्षांची कत्तल केल्या



नंतर वाहनात लाकडे टाकून नेत असताना सुद्धा हया तस्करकडे कोणत्या अधिकाऱ्याचे लक्ष का नाही गेल्या तीन चार महिन्या पासून वृक्षांची कत्तल होत असताना तस्करवर कारवाई होत नसल्यामुळे वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे .

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com



# आरआरसीचे संस्थापक बंडूभाऊ देशमुख यांचा वाढदिवस दणक्यात साजरा



## सायं दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट आता झाले ग्लोबल

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला :** आर आर सी नेटवर्कचे संस्थापक बंडूभाऊ देशमुख यांचा वाढदिवस दणक्यात साजरा झाला.

वाढदिवसानिमित्त सिटी न्यूज ई पेपर लाँच करण्यात आले. आता हे वृत्तपत्र ग्लोबल झाले. आर.आर.सी समूहाचे संस्थापक संचालक तथा दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट वर्तमानपत्राचे मुख्य संपादक प्रदीप उर्फ बंडूभाउ देशमुख यांचा वाढदिवस ग्रीनफिल्ड थ्री सिक्स्टी टर्फवर अतिशय उत्साह आणि जोरात साजरा केला गेला. यावेळी देशमुख परिवारातर्फे बंडूभाऊंचे अभिष्ठचिंतन करण्यात आले.

बुधवारी विविध लोकोपयोगी कार्यक्रम घेण्यात आले. गोरक्षण संस्थेत बंडूभाऊंची तुला करत गोमातेला चाऱ्यासोबत गुळाच्या भेल्या देण्यात आल्या. त्याच बरोबर दुपारी ग्रीन फिल्ड थ्री सिक्स्टी या ठिकाणी आर आर सी समूहातर्फे बंडूभाऊंचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी आर आर सी नेटवर्कचे शंभराहून अधिक कर्मचारी, केबल ऑपरेटर आदींची उपस्थिती होती. यावेळी देशमुख परिवारासोबत केक कटिंगचा कार्यक्रम झाला. शुभेच्छांचा वर्षाव यावेळी बंडूभाऊंवर करण्यात आला. दैनिक सिटी सुपरफास्ट दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. त्याच बरोबर सिटी न्यूज सुपरफास्ट ई पेपर साईट लान्च करण्यात आली. आता सिटी न्यूज सुपरफास्टचा ई पेपर रोज दुपारी ४ वाजता ईपेपर डॉट सिटीन्यूजसुपरफास्ट डॉट कॉमवर उपलब्ध होणार आहे. त्यामुळे वाचकांना त्या दिवशीचा पेपर त्याच दिवशी जगात कुठे ही एका



क्लिकवर वाचता येणार आहे. या वाढदिवस सोहळ्यात देशमुख परिवाराचे सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी पंडीत सुदर्शन शर्मा यांनी शुभ आशीर्वाद दिले. यावेळी अकोला जिल्हा कॉन्ट्रक्टर अ?ड इंजिनिअर्स असोसिएशनचे पदाधिकारी मोठ्या संख्येत उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार आरजे अंजिक्य देशमुख यांनी केले.















## तिक्ष्णगत महोत्सव २०२५

# आदर्श शिंदेंच्या आवाजाची अकोल्यात जादू




प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला :** अवघ्या महाराष्ट्राच्या गळ्यातील ताईत असलेले गायक आदर्श शिंदे यांच्या सुरांनी अकोलेकर मंत्रमुग्ध झाले. निमित्त होते, तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटीतर्फे आयोजित 'तिक्ष्णगत महोत्सवा'चे. गोरक्षण संस्थानमागील मैदानावर पार पडलेल्या ऐतिहासिक 'आदर्श शिंदे कॉन्सर्ट'ला अकोल्यातील तरुणाईने अभूतपूर्व गद करत रेकॉर्डब्रेक प्रतिसाद दिला.

तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटी आणि अजिंक्य भारत परिवाराचे डॉ. सुगत वाघमारे, तनुजा सुगत वाघमारे आणि तिक्ष्णगत वाघमारे यांनी अकोलेरांसाठी ही पर्वणी उपलबध करुन दिली. मंगळवार, १६ डिसेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता कार्यक्रमाची दमदार सुरुवात झाली. सुरुवातीला प्लेबॅक सिंगर जनार्दन धात्रट यांनी 'चंद्रभागेच्या तीरी' हे भक्तीगीत सादर केले. त्यानंतर नाशिक आयडॉल अमित पगारे यांनी 'आता तरी देवा मला पावशील काय' आणि प्रबुद्ध जाधव यांनी 'पाउले चालती पंढरीची वाट' ही भक्तीगीते सादर करून वातावरणात चैतन्य निर्माण केले.

### आदर्श शिंदेंच्या आगमनाने मैदान दुमदुमले

◆ जसा आदर्श शिंदे यांचा रंगमंचावर प्रवेश झाला, तसा उपस्थित हजारो तरुणांनी एकच जल्लोष केला. आपल्या घराण्याचा वारसा जपत त्यांनी आजोबा प्रल्हाद शिंदे आणि वडील आनंद शिंदे यांची 'तूच सुखकर्ता', 'पार्वतीच्या बाळा' ही गाणी सादर करून कार्यक्रमाची उंची गाठली. 'दगडी चाळ' चित्रपटातील 'मोरया मोरया' गाणे सुरू होताच संपूर्ण मैदानात टाळ्यांचा कडकडाट झाला. यावेळी बोलताना आदर्श म्हणाले की, 'आज इथे अंकुश चौधरी असता, तर तो नक्कीच नाचला असता!! त्यानंतर 'देवा तुझ्या गाभाऱ्याला', 'अरे भावा माझा जयभीम घ्यावा', 'माझ्या शिवबारं' यांसारख्या गाण्यांनी अकोलेकरांना अक्षरशः वेड लावले. तर, 'नव्हतं मिळत पोटाला, आता कमी नाही नोटाला. माझ्या भिमाची पुण्याई, अंगठी सोन्याची बोटाला' या गाण्यावर उपस्थित तरुणाई बेधुंदपणे थिरकली. मुंबईहून आलेल्या विशेष वाद्यवृंदाने (म्युझिक टीम) संगीताची साथ दिली, तर निवेदिका माधुरी भारती, पल्लवी डोंगरे आणि आकांक्षा गोमासे यांनी आपल्या बहारदार निवेदनाने प्रेक्षकांची मने जिंकली.

### तिक्ष्णगत वाघमारे यांचा वाढदिवस उत्साहात

◆ कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे 'अजिंक्य भारत'चे मुख्यसंपादक तिक्ष्णगत वाघमारे यांचा वाढदिवस. सामाजिक कार्याचा वारसा समर्थपणे चालवणाऱ्या तिक्ष्णगत यांचा वाढदिवस आदर्श शिंदे आणि उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अकोलेकरांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

### डॉ. सुगत वाघमारेंचे मानले आभार

◆ 'तिक्ष्णगत महोत्सवाचे सातत्यपूर्ण आयोजन करणे सोपे काम नाही. मला अकोल्यात बोलावल्याबद्दल मी डॉ. सुगत वाघमारे यांचा ऋणी आहे. आज प्रथमच मला अकोल्याच्या भूमीत आजोबा आणि वडिलांची गाणी गाण्याचे भाग्य लाभले,' अशा भावना आदर्श शिंदे यांनी यावेळी व्यक्त केल्या.

## झोडगा फाट्यावर प्रतिबंधित गुटखा जप्त

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**बार्शिटाकळी :** पिंजर पोलिस स्टेशन अंतर्गत झोडगा फाट्यावर गुटखा व पान मसाला जप्त करून आरोपीवर कारवाई केली. हेकॉ बाळू येवले यांच्या फिर्यादीनुसार, १५ डिसेंबरला झोडगा फाटा परिसरात गुटखा व पान मसाला विक्रीसंदर्भात माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर त्यांनी रवींद्र देविदास मोरे (४८) रा. तेलीपुरा, बोरगाव मंजू यांचेवर अन्न व सुरक्षा मानके अधिनियम प्रमाणे कारवाई केली. यावेळी पोलिसांनी गुटखा पाऊच, पान मसाला पाउच, तंबाखू पाउच असा एकूण २२ हजार २९० रुपयांचा माल जप्त केला.

## आरोग्यम् धनसंपदा नंदिनी ग्रुपच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला :** 'आरोग्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे हा विचार करून देशमुख महिला मंडळ अकोला नंदिनी ग्रुपच्या वतीने १४ डिसेंबर रोजी आरोग्य तपासणी शिबिराचे गजानन महाराज विद्यालय कुरणखेड येथे आयोजन करण्यात आले.

कुटुंबाच्या आणि समाजाच्या आरोग्याची काळजी घेण्यात स्त्रियांची भूमिका महत्त्वाची असते. सामाजिक बांधिलकी व आरोग्यपूर्ण जीवनशैलीचे महत्व अधोरेखित करून नंदिनी ग्रुपच्या वतीने हा उपक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाला मंडळाच्या अध्यक्षा राजश्री देशमुख, सचिव स्वप्नाली देशमुख, ज्येष्ठ सल्लागार कविताताई उपस्थित होत्या. डॉ.रणजित देशमुख (अस्थिरोगतज्ञ), डॉ. मधुसूदन अपतुरकर (अस्थिरोगतज्ञ), डॉ. महेश देशमुख (स्त्रीरोगतज्ज्ञ), डॉ. यशश्री देशमुख( स्त्रीरोगतज्ज्ञ) डॉ. सागर वसतकर(फिजीशीयन) डॉ. शिवानी देशमुख( दंतरोगतज्ञ), डॉ. अनुराधा थोरात (स्त्रीरोगतज्ज्ञ) डॉ. गायत्री देशमुख यांचे या शिबिरा करीता अमूल्य असे योगदान लाभले.

या शिबिराच्या माध्यमातून दिनांक १४ डिसेंबर रोजी कुरणखेड येथील नागरिकांची अस्थिरोग, बालरोग, स्त्री रोग, हृदयरोग, दंत व मुख रोग यातील तज्ञ डॉक्टरांनी तपासणी करून औषधोपचार दिले. बहुसंख्य ग्रामस्थांनी या संधीचा लाभ घेतला व आपली आरोग्य तपासणी करून घेतली. या कार्यक्रमाचे संचलन स्मिता देशमुख यांनी केले तर आभारप्रदर्शन विजया देशमुख यांनी केले.आरोग्य तपासणी शिबिर सफल करण्याकरिता विशेष सहकार्य अध्यक्षा राजश्रीताई, ज्येष्ठ सल्लागार कविताताई, सचिव स्वप्नाली, ग्रुप लीडर विजया मंजुषा, डॉ. शिवानी, संध्या, इंदुताई, ज्योतीताई, उज्वला, वैशाली, मीना, विद्या, अनघा, भावना, शीवाजी हायस्कूल टाउन ब्रांच अकोला चे मुख्याध्यापक मनोज देशमुख, शाळेचे शिक्षक सुरवाडे सर, माजी सरपंच उज्वल देशमुख यांचे सहकार्य लाभले.

# नाईक होमिओपॅथी येथे असाध्य आजारावर उपचार केले जातात

◆ गेली ४० वर्षे सर्व आजारांवर यशस्वी उपचार केल्याचा दावा

प्रतिनिधी १८ डिसेंबर

**अकोला :** नाईक होमिओपॅथी मध्ये थॉयरॉईड, लठ्ठपणा, ॲसीडीटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधीवात, मायग्रेन, पिसीओडी सारख्या असाध्य आजारावर उपचार करून रूग्णांना पुन्हा जीवन प्रवाहात आणण्याचे कौशल्य आहे. ॲडव्हॉन्सड् होमिओपॅथीच्या उपचाराने आजमितीस हजारो रूग्णांनी त्याचा लाभ घेतलेला आहे. गेल्या ४० वर्षापासून नाईक होमिओपॅथी येथे शरीराच्या सर्व आजारावर




सर्वांगीण यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रूग्णांना कुठेही फायदा झाला नाही. अश्या रूग्णांनी एकदा अवश्य भेट द्यावी

अधिक माहिती मोबाईल क्र. ९१७५९५७१२९, ९१३००१६१२९ व Naikhomoeopathy.com (Youtube) वर माहिती घ्यावी.

प्रज्ञा नावाच्या रुग्णाने आपला अनुभव सांगितला. नाईक होमिओपॅथी येथे येण्या अगोदर मला थायरॉईडचा त्रास होता. माझे टी.सी.एच ३५ पर्यंत वाढले होते. माझे हिमोग्लोबीन बरेच कमी झाले होते. वजन वाढले होते. मुडस्वींग व्हायचे. चिंता करत राहायची. आता नाईक होमिओपॅथी येथे ३ महिन्यापासून ॲडव्हॉन्सड् होमिओपॅथी उपचार घेत असता माझे थायरॉईड लेव्हल (०.६) नॉर्मल झाले आहे. हेमोग्लोबीन वाढले आहे. या तीन महिन्यात माझे साडे तीन किलो वजनही कमी झाले आहे. मुडस्वींग छान झाले आहेत. आनंदी राहते. चिंता करण्याचे दुर झाले. या तीन महिन्याच्या ॲडव्हॉन्सड् उपचाराने मी खूप समाधानी आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK